सदर्हूचा मराठी तरजमा.

आनरेबल मौन्ट स्टुवर्ट एलफिन्स्टन
पुणें येथील रेसिडेंट यांस,

साहेब,

तुमचें तारीख १८ माहे मजकूरचें पत्र मला पावलें. माझे तारीख ५ माहे जूनचे पत्राचा खुलासा कर्ण्यांत मीं तुम्हांस कळवितों कीं विंचूरकर, पुरंदरे व गोखले यां जाहागिरदारांचे वकिलांस जातीचे जाहगिरींचे बाबदींत मीं आश्वासनें दिलीं आहेत तीं इतकीं मजबूत आहेत कीं माझे मर्त्ते तीं लेखी वचना प्रमाणें आहेत व जशीं लेखी वचनें यावीं त्याप्रमाणेंच तीं इंग्रज सरकारचा विश्वास गुंतविणारीं आहेत असें मला मानणें भाग आहे. पेशवे शरण आल्यावर ही त्या लोकांचे मदतीची गरज नाहींशी झाली नाहीं. त्यांचे (पेशव्यांचे) फौजेची दाणादाण करण्यास व त्यांचे बदललेले स्थितीस त्यांचे मन राजीकर्ण्यास त्यांची (वरलिहिलेले चीफ यांची) मदत अवश्य पाहिजे होती व ती त्यानीं हमेषा मोकळेमनानें दिली. तो हेतू सिद्धिस जाण्याचा बंदोबस्त कर्ण्यास व त्याप्रमाणेंच गैरवाजवी आशा दूर करण्यास साधेल तितकें सत्वर त्यांस कांहीं तरी विशेष खुलासेवार कळविणें महत्वाचें होतें, व ज्या वेळेस असें अश्वासन देणें अवश्य होतें त्या ऐन वेळेस तुमचें तारीख २८ माहे मे चें पत्र मला येऊन पोंहोचलें त्यामुळें मीं त्याप्रमाणें करण्यास समर्थ झालों. म्हणून मीं संतोष मानिला.

तुम्ही अटकळ करितां त्याप्रमाणें विंचूरकर यांचे वकिलानें कळविलेला मजकूर खोटा आहे, कारण, त्याचे मालिकांनीं जातीच्या जाहगिरीची देहनगी नाकबूल केली नाहीं. प्रथम पासून ते त्याबद्दल आभारी झाले आहेत. इतकें खरें आहे कीं तुमच्यानें करवेल तितकी त्यांजवर अणखीं मेहेरबानगी करण्याविषयीं मीं तुम्हांस ल्याहावें अशी त्यानीं मला परम उत्कंठेनें विनंती केली

व त्यांचे स्वारांपैकीं कांहीं स्वार तुम्हीं कायम ठेवावे म्हणून त्यांत मोठी फिकीर होती. मी त्यांस कळविलें कीं तुह्मांवर हरएक प्रकारें वाजवी मेहेरबानगी होण्याविषयीं माझी खात्री आहे; परंतु तुमचे जातीचे जाहगिरी शिवाय अणखीं कोणतेही गोष्टीविषयीं मला तुम्हास वचन देतां येत नाहीं.

बाजीराव यांजबरोबर राहण्याचे बाबदींत विंचूरकर हे कधींही बोलले नाहींत व दक्षिणेस परत जाण्याचे बाबदींत ठराव ह्मणून त्यांनीं कधीं कोणतीही गोष्ट काढिली नाहीं. पुरंदरचे चीफ व रामचंद्र व गोखल्याचे फौजेवर जे मुख्य होते त्यांविषयीं ह्मटलेंतर त्यांस जीं वचनें देण्यांत आलीं तेणे करूनच ते प्रथमपासून संतुष्टसे दिसले व त्यांनीं अधिक कांहींच मागितलें नाहीं; व त्यांनीं एकादी विनंति केली असती तर ज्या विंचुरकरांस त्यांचे खानदानी व पदवीमुळें मेहेरबागीनें व बहुमानानें वागविणें हें तजविजीचें होईल असें मला वाटलें त्या विंचुरकरांकडे जे लक्ष मीं पुरविलें तें लक्ष त्यांचे विनंतीकडे मीं पुरविलें नसतें.

मुक्काम नीलि तारीख २६ जुलई सन १८१८.	मीं आहे वगैरे, (सही) जॉन माल्कम

Extract from the Sarinjam List submitted in 1819 by the Hon'ble Mountstuart Elphinstone then Sole Commissioner in the Deccan to His Excellency the Governor General of India.

Serial Number	Name.	Class.	Remarks.	Decision.	Total of the Jaghir as it stood at the breaking out of the war.	Number of years in possession.	Jaghir or Yearly allowance to be restored.		For what period recommended.
							Kamal or greatest recorded collection.	Estimated real value at present.	
1	Vithal Narsing Vinchurkar.	Sardar or great Chief.	A great Chief; most of his Jaghir is of ancient date; submitted to Sir John Malcolm with the Peishwa.	The whole of his personal lands according to the Daftar to be restored. This is proper in consequence of the respectability of the Chief and of the promises of Sir John Malcolm Communicated in his letters dated 5th June and 26th July 1818.	1238568	58	55556-2	35963-3-2	Hereditary.

VITHAL NARSING VINCHURKAR.

1 The whole of the personal lands of the Vinchurkar according to the Daftar to be restored. This is proper in consequence of the respectability of the Chief as they were promised by Sir John Malcolm to be restored hereditarily as Per his letters of the 5th June and 26th July 1818. To be hereditary.

सदहूचा मराठी तरजमा.

नंबर.	नांव.	प्रत.	व्याख्या.	ठराव.	एकंदर जाहागीरीचें उत्पन्न लढाईचे सुरुवातसि होते त्याप्रमाणें रुपये.	कब्जांत किती वर्षे होते त्या वर्षांची संख्या	जाहागीर अथवा वार्षिक नेमणूक बाहाल करावयाची ती.	किती काल पर्यंत चालण्याविषयीं शिफारीष झाली आहे.
१	विठ्ठल नरसिंह विंचूरकर	सरदार म्हणजे मोठें चीफ	मोठे चीफ; यांचे जाहागीरीपैकीं बहुतेक प्राचीन तारिखेची आहे; हे पेशव्यांबरोबर सर जान मालकम यांस शरण आले.	यांच्या दरोबस्त खासगत जमीनी दफतरांत लिहिल्याप्रमाणें बाहाल करावयाच्या. या चिफांचे प्रतिष्ठितपणास्तव व सर जान मालकम यांचे तारीख ५ जून व २६ जुलई सन १८१८ चें पत्रांत कळविलेले वचनास्तव असें करणें वाजवी आहे.	१२३८५६८	५८	कमाल ह्मणजे फार मोठी जमाबंदी रिकार्डांत दाखल आहे ती ५५५५६-२ सांप्रत वास्तविक वसूली आकार ३५९६३-३-२	वंशपरंपरेनें.

ह्या सरंजाम पटाच्या उताऱ्या शिवाय एलफिन्स्टनसाहेब कमिशनर यांनीं आपले दफ्तरांत शेरा निराळा लिहून ठेविला तो असा;—

विठ्ठल नरसिंह विंचुरकर.

दफ्तरांत लिहिल्याप्रमाणें विंचुरकर यांच्या दरोबस्त जातीच्या जमिनी (सरंजाम) त्यांजकडे सोडावयाच्या आहेत. सदई जमिनी (सरंजाम) सर जॉन मालकम् यांनीं आपले तारीख ५ जून व तारीख २६ जुलई सन १८१८इ० चें पत्रांत वंशपरंपरेचे शर्तीनें चालविण्याविषयीं वचन दिलें आहे सबब या सरदारांचे थोरपणास्तव तसें करणें बराबर आहे. वंशपरंपरेनें चालावच्या.

विठ्ठलराव विंचुरास पोंहचले तेव्हां त्यांजबरोबर पंधराशें स्वार होते. शिवाय हत्ती, उंट वगैरे सरंजाम बराच होता. या जनावरांस चाऱ्याची अडचण पडूंनये झणून एलफिन्स्टन साहेब यांनीं, विंचुरापासून आठ कोसांवर गोदातीरीं चाटोरी झणून गांव आहे तेथील एक मोठें कुरण, व विठ्ठलराव हे पुण्यास गेले असतां तेथें ही वरील अडचण पडूंनये म्हणून सिंहगडाजवळ डोणजे गांवानजीक एक कुरण, अशीं दोन कुरणें, त्यांचे जातीचे सरंजामाशिवाय त्यांस नवीन बक्षिस दिलीं.

विठ्ठलराव हे बाजीरावसाहेब यांजबरोबर गेले असतां त्यांचे पश्चात इंग्रज सरकारानें त्यांचे ताब्यांतील किल्ल्यांत अंमल केला यामुळें त्यांतील खजिना व मौल्यवान चिजवस्त सर्व गेली. पुढें ते विंचुरास आल्यावर त्यांस आपला खर्च चालविण्यास कांहींच आधार राहिला नाहीं. तशांत त्यांचे जातसरंजामाचे व इनामाचे गांव व वतनें त्यांचे कबज्यांत येण्यास सरासरी एक वर्ष लागलें त्यामुळें त्यांस नवीन सावकारी देण्याचा पेंच झाला. शिवाय, त्यांस पेशवाई अमलांतील फौजे संबंधी वगैरे पुष्कळ देणें होतें. त्याबद्दल त्यांस सावकार लोकांचे तगादे लागले. हा मजकूर एलफिन्स्टन साहेब यांस कळल्यावर त्यांनीं सावकार लोकांस बोलावून त्यांस असें कळविलें कीं, "दौलती संबंधाचे देणें तें दौलती बरोबर गेले. त्याबद्दल तुम्ही आतां विंचूरकर यांस तगादा करूंनये." याप्रमाणें साहेबमौसूफ यांनीं सावकार लोकांस सांगून विठ्ठलराव यांस मागील देण्याचे पेचांतून मुक्त केलें.

एलफिन्स्टन साहेब यांनीं विठ्ठलराव यांजकडे फक्त जातीचा सरंजाम मात्र चालविला, यामुळें पूर्वापार चालत आल्याप्रमाणें आपले संस्थानचा जो खर्च चालविणें त्यांस अवश्य होते तो खर्च भागविण्याची त्यांस मोठी पंचाईत पडूंलागली. त्यांचे पदरीं पुरातन पिढीजादी नोकर मंडळी पुष्कळ होती. त्यांत कारभारी, कारकून, मानकरी, आश्रित, पेनशनर, वगैरे असून शिवाय हत्ती,

घोडे वगैरे पुष्कळ खटला होता. पैकीं हत्ती, घोडे वगैरेंची कळेल तशी व्यवस्था लावून त्या खर्चाचे अडचणीपासून ते मुक्त झाले. परंतु ज्या नौकर लोकांनीं चार पिढ्या इमानदारीनें नौकरी केली होती त्यांस एकदम दूर करण्याचें त्यांस मरणा पेक्षांही विशेष दुखः वाटूं लागलें. शिवाय नृसिंहजयंतीचा उत्साह वंशपरंपरानें चालत आला होता, त्याचे खर्चास त्यांचे पूर्वजांनीं दाहा हजार रूपयांची नेमणूक करून दिली होती. फक्त जातसरंजामाचे उत्पन्नानें या सर्व खर्चाचा कसा निर्वाह होईल अशी त्यांस विवंचना प्राप्त होऊन त्यांचें मन अगदीं अस्वस्थ झालें. तथापि इंग्रज सरकारानें जें उत्पन्न चालविलें आहे तेव्हड्योनेंच होईल तसा निर्वाह करावा असें त्यांनीं मनांत आणून छुटलेले सरंजामाचे उत्पन्नापैकीं पंधरा हजारांचें उत्पन्न केवळ पिढीजादे नौकरांचे निर्वाहाकरितां नेमिलें. त्यापैकीं पेनशनर लोकांस सनदी जामिनी, आश्रित मंडळीस वर्षासनें, कारभारी, कारकून, वगैरेंस पगार व कितीएक आश्रितांस फक्त पंक्तीचें भोजन, याप्रमाणें ठरवून सर्वांचा सरासरी निर्वाह चालेल अशी व्यवस्था केली. नृसिंहजयंतीचे उत्साहास पांच हजार रुपये खर्च करण्याचा नियम करून त्यांत होईल तितकी काटकसर ते करूं लागले. तसेंच स्वतःचा लवाजमा वगैरे खर्चाच्या संबंधानें पुष्कळ तंगी सोसून दिवस काढावे असा त्यांनीं दृढ निश्चय करून तसा क्रम चालविला. तथापिही एकादे वर्षी अवर्षण पडलें किंवा घराण्याचे थोरपणास्तव एकादा आगंतुक खर्च करावा लागला ह्मणजे तो भागविण्याची त्यांस मोठी मारामार व पंचाईत पडे व कधींकधीं तर ऋण सुद्धां करावें लागे. सबब, पुढें मालकम् साहेब मुंबईचे गव्हरनर झाल्यावर त्यांनीं आपल्या सर्व स्थितीची कची हकीकत त्यांस श्रुत केली. ती ऐकून त्या साहेबांस वाटलें कीं हे थोर प्राचीन सरदार दरिद्रावस्थेस मिळाले ते केवळ आपले मालिकांबरोबर नमकहरामी न करितां नेकीनें वागल्यामुळेंच मिळाले आहेत, याक-

रितां आपल्याकडून होईल तितकी त्यांस मदत करणे उचित आहे. सबब केवळ मेहरबानीस्तवच त्यांनीं त्यांचें स्वतःचे लवाजम्याचा खर्च भागण्यासाठीं त्यांस मायगांव व ब्राह्मणगांव अशीं दोन गांवें नवीन दिलीं. त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा एकंदर आकार रुपये दोन हजार होता. पैकीं मायगांव गोदावरी तिरीं व ब्राह्मणगांव विंचुरा नजीक, अशीं आहेत. हीं गांवें त्यांचे अंतकाळपर्यंत त्यांजकडे चाललीं. याच संधीस विट्ठलराव यांच्या जेष्ठ कन्येचे विवाहाचा निश्चय झाला सबब त्याचे खर्चाचे मदतीस मालकम् साहेब गव्हरनर यानीं त्यांस पंधराहजार रुपये बाक्षिस दिले.

वर लिहिलेली लढाई चालू असतां, इंग्रज सरकारानें विट्ठलराव विंचूरकर यांचे लष्करी सरंजामा बरोबर त्यांची उत्तर हिंदुस्थानांतील इनामें जप्त करून शिंदे व इतर राजे रजवाडे यांस देऊन टाकिलीं असें वर एकेठिकाणीं लिहिलें आहे. पुढें त्या इनामांचे बाबदींत काय हकीकत झाली हें वाचकांचे समजुती करितां आम्ही पुढें थोडक्यांत लिहितों.

विट्ठलराव हे पुण्याचे रेसिडेंट एलफिन्स्टन साहेब यांचे मर्जी विरुद्ध बाजीराव साहेबांबरोबर आखेर पर्यंत नेकीनें बागल्यामुळें त्यांजविषयीं साहेबमौसूफ यांचे मनांत वाईटपणा आला होता; परंतु पुढें ते साहेब मुंबईचे गव्हरनर झाल्यावर, प्रथम विठ्ठलरावांचे वडील नरसिंहराव यानीं व त्यानंतर खुद्द विट्ठलराव यानीं पेंढारी लोकांचे बंदोबस्ताचे कामांत इंग्रज सरकारचे लष्कारी सरदारांबरोबर जें तारिफ करण्याजोगें वर्तन केलें होतें, व त्याचप्रमाणें दक्षिणेत इंग्रजी अंमल झाल्यानंतर, आपण आतां इंग्रजसरकाचे ताबेदार झालों त्यापेक्षां आतां आपणास त्यांचे तंत्रानें वागणें भाग आहे, असें विठ्ठलराव यांनीं पक्कें समजून, इंग्रज कामगारां बरोबर निराभिमानानें व इमानदारीनें केवळ कित्ता घेण्याजोगें वर्तन केलें होतें, या गोष्टी त्यांचे मनांत आल्यावर त्यांतील वाईट-

पणा दूर झाला; आणि त्यांचे घराण्याची कारकीर्द शाहू माहाराजांचे वेळेपासून असून त्यांचे पूर्वजांनीं पेशवाईत आपले जवांमर्दी मुळें मोठी योग्यता मिळविली होती आणि केवळ स्वराज्य नष्ट झाल्यामुळेंच तें घराणें दरिद्रावस्थेस मिळालेंहोतें, या गोष्टी त्यांचे मनांत ठसून त्यांस विठ्ठलराव यांचा कळवळा आला आणि योग्य संधी येईल त्यावेळेस त्यांजवर साधेल तितकी मेहरबानगी करण्याचा त्यामीं निश्चय केला, आणि पुढें विठ्ठलराव यानीं आपलीं सदर्हू इनामें परत मिळण्याविषयीं त्यांस अर्ज केल्यावर त्यांनीं तीं इनामें कधीं व कोणापासून संपादन केलेलीं होतीं या बद्दलची हकीकत व सनदा वगैरे पुरावे त्यांजपासून मागून घेऊन तीं (इनामें) त्यांस परत देण्याविषयीं इंडिया सरकारास सिफारिष केली. पुढें थोडकेच दिवसांनीं ते साहेब विलायतेस निघून गेले.

इंडिया सरकारानीं सदर्हू बाबदींत ग्वाल्हेरचें रेसिडेंट आणि बुंदेलखंडांतील पोलिटिकल एजेंट यांचे रिपोर्ट मागवून नंतर मुंबई सरकारास नाकबुलीचा जबाब पाठविला. त्या जबाबाची नक्कल पोट कागदां सहित मुंबईचे त्या वेळचे गव्हरनर यानीं पुण्याचें डेप्यूटी एजेंट यांचे मार्फत विठ्ठलराव यांजकडे पाठविली. ती वाचकांचे माहिती करितां आम्ही पुढें दाखल करितों.

No. 751.

POLITICAL DEPARTMENT.

Bombay Castle, 14*th July* 1829.

To

THE AGENT FOR SIRDARS IN THE DECCAN AT POONA.

Sir,

With reference to the translate of a Memorandum from the Vinchurkar's Vakeel dated the 14th November last, respecting his Master's claim to some Inams

in Hindustan, I am directed to transmit to you copy of a letter from the Deputy Secretary to the Supreme Government of the 15th May with copies of Communications from the Acting Resident at Gwalior and Agent to the Governor General in Bundelkhand on the subject, and to acquaint you that these Communications appear to the Governor in Council conclusive as to the Vinchurkar's claim in Hindustan.

You will be pleased to make known to Vinchurkar the Resolution of the Governor General in Council on the point at issue.

I have the honor to be &c.,

(Signed) CHARLES NORRIS,

Acting Chief Secretary.

To

WILLIAM NEWNHAM, Esquire,

Chief Secretary to Government of Bombay,

Sir,

I am directed to acknowledge the receipt of your despatch dated 2nd December last and to transmit, for the consideration of the Honorable the Governor in Council of Bombay, the accompanying copies of letters from the Acting Resident at Gwalior and Agent to the Governor General in Bundelkhand dated respectively the 20th January and 22nd Ultimo replying to calls made on them for information regarding the Districts and allowance claimed by the Vinchurkar.

The Right Honorable the Governor General in Council is quite satisfied from a perusal of the Minute recorded by the Honorable the Governor that subsequent to the surrender of Bajirao, the conduct of the Vinchurkar, as a subject of the British Government, has been in every respect unexceptionable and even exemplary ; but as already intimated in my letter dated 28th December 1827, his adherence to the

cause of the Peishwa during the war, was considered by the Government of the day, to have justified and required the resumption of all his rights and possessions of every description in Hindustan and they were in consequence transferred to Scindia and others and are no longer at our disposal.

I have the honor &c.,

(Signed) A STIRLING,

Deputy Secretary to Government.

Fort William,
15th May 1829.

(True Copies.)

(Signed) JOHN WARDEN,

Deputy Agent.

सदर्हूचा मराठी तरजमा.

नंबर ७५१.

राजकीय खातें.

जंजीरे मुंबई तारीख १४ जुलई सन १८२९ इ०

दक्षिणेंतील सरदार लोकांबद्दलचे पुणें येथील एजेंट यांस,

साहेब,

आपले मालिकाचे हिंदुस्थानांतील कांहीं इनामावरील हाक्याचे बाबदींत विंचुरकर यांचे वकिलाकडून तारीख १४ नोवेंबर सन १८२८ इ० ची एक यादी आली तिचे बाबदींत ग्वाल्हेर येथील अक्‌टिंग रेसिडेंट व गवव्हनरजनरल यांचे बुंदेलखंडांतील एजेंट यांजकडून आलेल्या पत्रांच्या नकलां सहित मुख्य सरकारचे डेप्युटी सेक्रेटरी यांजकडून तारीख १५ माहे मेचे आलेले पत्राची नक्‍कल मीं तुम्हांकडे सरकारच्या हुकुमावरून पाठवून तुम्हांस असें कळवितों कीं, विंचूरकर यांचे हिंदुस्थानांतील हाक्याविषयीं सदर्हू पत्रें गव्हरनर जनरल इन्कौन्सिल यांस निर्ण-

यात्मक वाटतात. याजकरितां गव्हरनरजनरल इन्कौन्सिल यांनीं सदई बाबदींत जो ठराव केला तो तुम्ही विंचुरकर यांस कळवावा.

मीं आहें वगैरे.

(सही) च्यारलेस नारीस,

अक्टिंग चिफ् सेक्रेटरी.

ऊइलियम न्युनहाम एस्कायर

चिफ् सेक्रेटरी निसबत सरकार मुंबई

साहेब, यांस.

तुह्मांकडून तारिख २ डिसेंबर सन १८२८ चें पत्र आलें तें पावलें असें हुकमा वरून कळवून, विंचूरकर यानीं ज्या माहालांवर व नेमणूकेवर दावा केला होता ते माहाल व नेमणूक यां विषयींची माहिती पाठवावी ह्मणून इकडून ग्वाल्हेरचे अक्टिंग रेसिडेंट व गव्हरनर जनरल यांचे बुंदेलखडांतील एजेंट यांस पत्रें लिहून गेलीं असून त्यांचे जबाबांत त्यांजकडून तारिख २० ज्यान्यूआरी व तारिख २२ माहे एप्रिलचीं पत्रें आलीं, त्याच्या नकला नेक नामदार गव्हरनर साहेब दर इजलास कौन्सिल यांचे विचाराकरितां मी या सोबत पाठवीत आहें.

नेक नामदार गव्हरनर साहेब यांनीं लिहून ठेविलेलें मिनिट राईट आनरेबल धी गवरनर जनरल इन्कौन्सिल यांनीं वाचून पाहिल्यावरून बाजीराव इंग्रज सरकारचे स्वाधीन झाल्यावर इंग्रज सरकारचे ताबेदार या नात्यानें विंचूरकर यांची वर्तणूक हरएक प्रकारें निर्बाधाची व किंचा घेण्यासारखी सुद्धा चालत आली आहे अशी त्यांची अगदीं खात्री होत आहे; परंतु मीं आपले तारिख २८ माहे दिसेंबर सन १८२७ इ० चे पत्रांत पूर्वींच कळविलें आहे त्याप्रमाणें लढाई चालू असतां ते पेशव्याचे पक्षास धरून राहिले त्यामुळें त्यांचे हिंदुस्थानांतील हरएक प्रकारचे हक्क व दराबेस्त अंमल खालसा करणें जरूरीचें व वाजवी आहे असें

त्या काळच्या सरकारास वाटलें त्यामुळें ते (खालसा करून) शिंदे व इतर संस्थानिक यांस देण्यांत आले. ते आतां अमचे स्वाधिन राहिले नाहींत.

किले उईलियम तारिख १५ माहे मे सन १८२९ इ० } मी आहे वगैरे. सही ए. स्टरलिंग डेप्युटी सेक्रेटरी निसबत सरकार.

इंडिया सरकारचे वर लिहिलेले जबाबांत विठ्ठलराव यांची सदर्हू इनामें न सोडण्यास ते लढाई आखेर पेशव्यांचे पक्षास नडून राहिले होते, हें मुख्य कारण लागूं केलें होतें. सबब सदर्हू लढाई सुरू होंण्याचे वेळेस इंग्रज सरकारचे एक सेनापती जनरल स्मीथ यांजबरोबर आपलें वर्तन कसें होतें व आपल्यास इंग्रज सरकारचा पक्ष सोडून जाण्यास काय कारण झालें होतें त्याचें स्पष्टीकरण करण्याचा विठ्ठलराव यांनीं निश्चय करून त्याबद्दल दाखला मिळण्याविषयीं जनरल स्मीथ यांस विनंती केली. ती जनरल मौसूफ यानीं मान्य करून त्यांस मागितलेला दाखला दिला. सदर्हू दाखल्याची नक्कल वाचकांचे माहितीकरितां आम्ही पुढें दाखल करितों.

" It is impossible I could receive the accompanying letter from the Vinchurkar with indifference or neglect. I therefore proceed to answer it.

Perhaps, indeed, I am positive there is no Jahagirdar in the Deccan who has served so much or mixed so much with British officers as Tatiasaheb Vinchurkar.

He began with his Contingent with Colonel Wallace, and he took the field with me in 1815-16-17. About 1500 of his horse were with me when the disturbances broke out and I had great difficulty in making them leave my Camp, though they must have been aware that Bajirao had gone to war with us. I mention this because it was all characterestic of Tatiasaheb Vinchurkar. He thought it was his duty to keep his troops with me, because his master had ordered them there, and it was not, in fact, till after

this Sirdar had received a warning that I would treat his people as enimies, if they did not leave my Camp, that they moved away.

In the same spirit of punctilious good faith, when he joind Bajirao's army, he stood to him through all his difficulties, and it is honorable to him to say and no more than just that he did his duty to that unfortunate prince far better than any other Jahagirdar of his army, and I am convinced from what I know of Tatiasaheb's honorable disposition that he would now adhere to our Government, if need come, with the same fidelity and resolution that he manifested in the cause of the Peishwa.

I have understood, Tatiasaheb has sufferred from not submitting earlier ; but this was impossible for one of his honorable and chivalrous disposition. It was not in his nature to have acted like the Nipankar or Chintamanrao who had Vakeels with Mr. Elphinstone the whole time they were pretending to fight for Bajirao. But these Jahagirdars received back their Estates, and Tatiasaheb is reduced to extreme poverty for his faithful adherence to his lawful sovereign until that sovereign surrendered himself to our power.

Were the example any longer useful, it would be necessary : but policy and generosity seem to invite us to forgive the loyalty of these highminded men to their own sovereign and endeavour to secure that virtue from them to our own Government.

Tatiasaheb's fallen fortune as one of the oldest and most influential families in the Deccan is a source of extensive regret in this country and any amelioration that could be applied to his reduced circumstances would highly raise our reputation for forbearance and generosity to those great men who have come under our power."

(Signed) LIONEL SMITH,

Major General.

Camp Seroor,
30th June 1829.

या सोबतचें पत्र विंचूरकर यांजकडून आलें आहे. त्याजकडे दुर्लक्ष करणें किंवा त्याची हेरसांड करणें अशक्य आहे. याकरितां त्याचा जबाब देण्यास मी प्रवर्तक होतों.

वस्तुतः मी साफ साफ बोलतों कीं, तात्या साहेब विंचूरकरां इतका सरकारचे लष्करी कामगारांत मिसळलेला किंवा त्यांजबरोबर नौकरी बजावलेला असा जाहागिरदार दक्षिणेंत कदाचित नसेलच.

या गोष्टीची सुरुवात त्यांनीं आपले पतकाचे स्वारांनिशीं कर्नेल वालेस यांजबरोबर करून सन १८१५--१६--१७ इसवीं या सालांत मजबरोबर मुलुकगीरी केली, आणि लढाई उपस्थित झाली त्यावेळेस त्यांचे सुमारें १५०० स्वार मजबरोबर होते; आणि बाजीराव हे आह्मांबरोबर लढाई करण्यास प्रवर्तक झाले असें जरी त्यांस समजलें होतें तरी त्या स्वारांनीं माझें लष्कर सोडून जावें असें करण्याची मला मोठी पंचाईत पडली. हें मी सांगतों याचें कारण असें आहे कीं हें सर्व तात्या साहेब विंचूरकर यांचा विशेष गूण दाखविणारें आहे. त्यांस असें वाटलें कीं आपली फौज मज जवळ ठेवणें हें आपलें कर्तव्यकर्मच होय, कारण आपले मालिकानीं ती मजजवळ ठेवण्या विषयीं हुकूम दिलेला होता. आणि वस्तुतः "तुमचे लोक माझें लष्कर सोडून गेले नाहींत तर त्यांजबरोबर मी शत्रूप्रमाणें वर्तन करीन असें मी त्यांस बजाऊन सांगें तोंपर्यंत त्या लोकांनीं माझें लष्कर सोडिलें नाहीं. मी त्यांस असें कळविल्यावर मात्र ते चालते झाले.

पुढें ते (तात्यासाहेब) बाजीराव पेशवे यांचे लष्करांत मिळाल्यावर ह्याच सुक्ष्माचारदृष्टीच्या इमानदारीचे इराद्यानें त्यांचे सर्व संकटांत त्यांस जडून राहिले, आणि त्या दुर्दैवी राजाचें लष्करांतील इतर हरएक जाहागिरदारापेक्षां त्यांनीं आपलें काम फारच चांगलें बजाविलें असें म्हणणें त्यांचे हुरमतीस योग्य असून तितकेंच यथान्याय ही आहे.

त्यांचे संभावित स्वभावाविषयीं जें कांहीं मला माहीत आहे त्यावरून मला अशी खात्री वाटत्ये कीं, त्यांनीं पेशव्यांचे तर्फेनें जी इमानदारी व निश्चय दर्शित केला त्याच इमानदारीनें व निश्चयानें, जरूर पडेल तर, ते आतां आमचे सरकारास जडून राहातील.

मला असें कळून आलें आहे कीं, तात्यासाहेब (इंग्रज सरकारास) अधिक लौकर शरण न आल्यामुळें त्यांचें नुकसान झालेंआहे; परंतु त्यांजसारिखे संभावित व सरदारी स्वभावाचे मनुष्यास तसें करणें अशक्य होतें. निपाणकर किंवा चिंतामणराव हे बाजीरावांकरितां लढाई करण्याचें मिष करीत असतां मिस्तर एलफिन्स्टन यांजजवळ त्यांचे वकील होते. त्यांच्याप्रमाणें वागणें हें त्यांचे (विंचूरकरांचे) अंगीं वसत नव्हतें. तत्रापि त्यां जाहागिरदारांस त्यांचीं संस्थानें परत मिळालीं आणि विंचूरकर हे, आपला सशास्त्र राजा इंग्रज सरकारचे स्वाधीन होईतोंपर्यंत, त्यास इमानदारीनें चिकटून राहिल्यामुळें अतिशय दरिद्रावस्थेस मिळाले आहेत.

हें त्यांचे उदाहरण या पुढें उपयुक्त होईल तर त्याची जरूर लागेल; परंतु ह्या अभिमानीं पुरुषानीं आपले राजाबरोबर इमानदारीनें वर्तन केलें तें माफ करून आपले राज्या करितां तो सद्‌गूण त्यांजपासून संपादन कर्ण्याचा यत्न कर्ण्यास राजरिती व औदार्य आम्हास पाचारण करितेंसें दिसतें.

तात्यासाहेब विंचुरकर यांचे घराणें दक्षिणेंतील अति पुरातन व अति भारदस्त घराण्यांपैकीं आहे म्हणून त्यांचे नष्टभाग्या पासून या देशांत अतिशय दुःख उत्पन्न झालें आहे, आणि त्यांचे खालावलेले स्थितीस जी एकादी सुधारणा लागू करितां येईल ती लागू केल्यानें जे हे थोर मनुष्य आपले ताब्यांत आले आहेत त्यांस सहनशीळता व मनाचा थोरपणा दर्शित केल्याबद्दल आमची मोठी सत्कीर्ती होईल.

मुक्काम शिरूर तारीख ३० जून सन १८२९ इ. } (सही) लायनेल स्मिथ
मेजर जनरल.

नंतर विठ्ठलराव यानीं त्या वेळचे मुंबईचे गव्हरनर मालकम् साहेब यांची समक्ष भेट घेऊन, आपलीं सदर्हू इनामें आपल्यास परत मिळण्याबद्दल, जनरल स्मिथ साहेब यांचें वर लिहिलेले दाखल्यानिशीं, त्यांस लेखी अर्ज दिला. तो अर्ज गव्हरनर मौसूफ यानीं स्विकारून सदर्हू बाबदींत इंडिया सरकारास सिफारीष केली; परंतु त्या सरकारानें पूर्वीप्रमाणेंच नाकबुलीचा जबाब दिला. त्या जबाबाची नक्कल मालकम् साहेब गव्हरनर यानीं विठ्ठलराव यांस समक्ष भेटींत देऊन तोंडानें त्यांची पुष्कळ प्रकारें समजूत केली. ते म्हणाले कीं "तात्यासाहेब! आपण आपले सशास्त्र मालिकांबरोबर इमानदारीनें जें वर्तन केलें तें ईश्वराचे घरीं रुजू आहे. हाल्लींचे काळांत हा एक चमत्कार आहे कीं जे कोणी नेकीनें वागतात ते दारिद्रावस्थेस मिळतात; परंतु जे इमान सोडून वेळ व रंग पाहून त्या बरहुकूम वर्तन करितात ते सधन होतात. असो; ईश्वर संकेताप्रमाणें सर्व गोष्टी घडतात. त्या पुढें कोणाचाही इलाज चालत नाहीं. आतां आपण समजावें कीं मी आपले शक्त्यनुसार आपणास समय विशेषीं मदत करीन. आपण दिलगीर होऊंनये." असें बोलून साहेबमौसूफ यानीं विठ्ठलराव यांस शिष्ट संप्रदायाप्रमाणें बिदा करून दिलें.

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील आपले पूर्वजांनीं महत् प्रयासें संपादन केलेलीं इनामें आपणास इंग्रज सरकाराकडून परत मिळणें अशक्य आहे असें विठ्ठलराव यांस पक्कें वाटलें. तत्रापी शिंद्यांचें घराण्याशीं आपले पूर्वजांचा जो बहुत ऋणानुबंध होता त्याची माहिती सांप्रतचे शिंदे यांस असेलच, याकरितां त्यांजकडे वकील पाठवून त्यांस आपले हलाकीची स्थिती कळवावी, आणि त्यांचे कबजांत असलेले आपले इनाम गांव सोडण्याविषयीं त्यांस विनंती करावी, असें विठ्ठलराव यांस वाटल्यावरून, त्यानीं आपले पदरीं राघोपंतदादा राजवाडे म्हणून मोठे प्रामाणिक व हुशार मनुष्य होते त्यांस शिंदे व ग्वाल्हेरीचे रेसिडेंट यांजकडे

बोलणें बोलण्याकरितां वकील नेमून कारण लागेल तर इंडिया सरकाराशीं पत्रव्यवहार चालविण्यासही आपले मुखत्यार म्हणून रवाना करण्याचें योजिलें; व हा मजकूर मालकम् साहेब यांस कळवून त्या कामाकरितां त्यांचा हुकूम घेतला, व त्यांजपासून ग्वाल्हेरीचे रेसिडेंट व इंडिया सरकारचे सेक्रेटरी यांच्या नांवांची पत्रें घेऊन ग्वाल्हेरीस राघोपंतदादा यांची रवानगी केली. नंतर थोडे दिवसांनीं त्यांचे मदतीस भाऊ पोतनीस यांसही पाठवून दिलें. त्या उभयतांनीं खुद्द शिंदे व ग्वाल्हेरचे रेसिडेंट यांजकडे उत्तर प्रांतांतील इनामी गांव सुटण्याविषयीं बहुत प्रकारें यत्न केला; परंतु तो सिद्धीस न जातां खर्च मात्र पुष्कळ झाला.

वरील कांमानिमित्त भाऊ पोतनीस व राघोपंतदादा या उभयतांचें ग्वाल्हेरीस बहुत दिवस राहणें झालें. त्यामुळें त्यांपैकीं भाऊ पोतनीस यांचा तेथील दरबारांत प्रवेश होऊन जनकोजी शिंदे यांचे हयातींत त्यांनीं तेथील दौलतीसंबंधी कांमकाजांत प्रमुखता संपादन केली. जनकोजी शिंदे हक्क * झाल्यावर जयाजीराव शिंदे हे अल्पवयस्क असल्यामुळें रामरावबाबा फाळके मुख्य कारभारी झाले. तेव्हां भाऊ पोतनीस यांनीं कांहीं दिवस त्यांचे हाताखालीं कारभार केला. नंतर त्यांनीं कांहीं दिवस भागीरथीतीरीं वास केल्यावर शेवटीं ते काशी येथें संन्यास घेऊन समाधिस्थ झाले. राघोपंतदादा यांची हकीकत अशी झाली कीं, ते भाऊ पोतनीस यांचे हाताखालींच कांहीं दिवस काम करून परलोकवासी झाले. त्यांचे चिरंजीव दिनकरराव यांस, हल्लीं राज्यावर जे शिंदे आहेत, ते अल्पवयस्क असतां, त्यांचे दौलतीवर इंग्रज सरकारानें मुखत्यार नेमिलें. पुढें शिंदे उमरींत येऊन त्यांनीं आपला सर्व राज्यकारभार संभाळिल्यावर ते उत्तर प्रांतीं आग्रा, प्रयाग, काशी वगैरे ठिकाणीं राहूं लागले. दिनकरराव यांनीं या देशांत मोठी कीर्ति मिळविली हें प्रसिद्धच आहे.

---

* परलोकवासी.

उत्तर हिंदुस्थानांतील; इनाम गांव सुटण्याबद्दल बहुत खटपट केली असतांही ते सुटले नाहींत, या कारणामुळें विठ्ठलराव यांस बहुत खेद झाला. दुसरें, मराठी राज्याचा ऱ्हास केवळ बाजीरावसाहेब यांनीं अविचारी पणाचें व गैरेशिस्त वर्तन केल्यामुळेंच झाला होता या गोष्टीचें त्यांस वारंवार स्मरण येऊन त्यांचें मन फारच उदास झालें होतें; तशांत त्यांस मस्तकशूलाचा आजार उत्पन्न होऊन तो इतका वाढला कीं शेवटीं त्यांस शके १७५७ पौष शुद्ध त्रयोदशी शुक्रवार यादिवशीं (सन अठराशें छत्तीस सालीं,) विंचूर येथें देवाज्ञा झाली. त्या समयीं त्यांचे वयास एकेचाळीसावें वर्ष होतें. हा मोठा दुःखाचा प्रसंग विठ्ठलरावांचे सर्व कुटुंबावर व पदरचे मंडळीवर व त्यांचे सर्व सरंजामी गांवांतील लोकांवर अकालीं गुजरल्यामुळें सर्वांस असह्य दुःख झालें; परंतु वर लिहिलेल्या सर्व लोकांनीं विठ्ठलराव यांच्या तिघा पुत्रांवर नजर देऊन उत्तरोत्तर त्या दुःखाचा त्याग केला.

विठ्ठलराव विंचुरकर यांचे हयातींत विंचूर संस्थानांत दरबारी कामकाजाची स्थिती कशी होती हें वाचकांचे लक्षांत येण्याकरितां ती आम्ही खालीं लिहितो.

दौलतीचा सर्व कारभार मुख्यत्वें करून जुने कारभारी बाळोबाबावा यांचे चुलत बंधू कृष्णाजी शामराव यांजकडे होता. कृष्णाजी शामराव यांचे कनिष्टबंधू विठ्ठलरावआबा यांजकडे सर्व मुलकी कामांची वहिवाट होती. नारायणराव यमाजी ऊर्फ भाऊ पोतनीस हे दौलतीचे खर्चाची व्यवस्था पाहून प्रपंच संबंधी ही न्यूनाधिक्याचें मनन करित असत. विठ्ठलराव यांनीं भाऊ पोतनीस यांस ग्वाल्हेरीस पाठविल्यावर त्यांच्या कामाची व्यवस्था त्यांचे निसबतीचे कामगार सर्व प्रकारें ठेवूं लागले. दरबारीं सर्व काम गोपाळ भास्कर परांजपे याजकडेस असून दौलती संबंधी इंग्रज सरकारचे दरबारांत जें काम पडे तें तेच करित होते. [हाल्लीं ही त्यांचे पुत्र बाबुराव गोपाळ हे विंचू-

रकरांकडून पुणें येथें वकिलीचें काम करीत आहेत.] अहमदनगर येथें कलेक्टर साहेबांचे कचेरींत माहाल संबंधी हमेषा काम पडत असल्यामुळें तेथेंही विठ्ठलराव यांनीं शिवाजीपंत छुरेगावकर या नांवाचें मनुष्यास वकील नेमिलें होतें. याप्रमाणें सुज्ञ, प्रामाणीक, स्वामिभक्त व निस्प्रह अशा मनुष्यांचे हातांत विचार पूर्वक कामें दिलीं असल्यामुळें विठ्ठलराव यांचे कारकिर्दीत त्यांचे सर्व रयत * लोक त्यांस आईबापाप्रमाणें मानून त्यांजबरोबर अत्यंत पूज्यबुध्धीनें वागत असत. अशाप्रकारची व्यवस्था असल्यामुळें सरकारी कामगारां पर्यंत कोणतेही प्रकारचा भोभाटा किंवा गिल्ला मुळींच गेला नाहीं. मोतद्दारापासून वर मुख्य कारभाऱ्या पर्यंत सर्व माणसें परंपरागत चाकरी केलेली व अनुभवलेली अशीं होती. विठ्ठलराव यांस सुदैवेंकरून अशा प्रकारची चांगली मदत असल्यामुळें त्यांस दौलती संबंधी कोणतेंही काम स्वतः पाहण्याची तसदी घ्यावी लागत नव्हती. यांमुळें त्यांस आपले आयुष्याचे शेवटचे दिवस केवळ धर्म विचारांतच घालविण्यास सबड झाली.

विठ्ठलराव नरसिंह यांस पांच स्त्रिया झाल्या. प्रथम स्त्रीशीं लग्न झाल्यानंतर त्यांचें दत्तविधान झालें. तेव्हां त्यांच्या दत्तक घेणाऱ्या मातुश्रीनीं त्या बाईचें नांव रुक्मिणीबाई असें ठेविलें. पुढें ती लवकरच परलोकवासी झाली. नंतर नांदुसकर यांचे कन्येबरोबर त्यांचा दुसरा विवाह झाला. त्या बाईचें नांव रुक्मिणी बाईच ठेवण्यांत आलें. ती बाई ऋतु प्राप्त होण्या पूर्वीच वारली.

नंतर विठ्ठलराव यांचे तिसरें लग्न गोविंदराव उडपी या नांवाचे गृहस्थाचे कन्येबरोबर धुळें मुक्कामीं झालें. गोविंदराव यांचे वडील उडपीराव यांनीं थोरले माधवराव साहेब पेशवे यांचे अमलांत बहुत वर्षे पर्यंत धारवाड सरसुभ्याचें काम केलें असून त्यांचे घराणे कर्नाटक प्रांतीं अद्यापी प्रसिद्ध आहे. ह्या बाईचें नांव

---

* त्यांस सारा देणारे.

गंगाबाई असें ठेवण्यात आलें. त्यांस दक्षिणेंत इंग्रजी अमल झाल्यावर पांच साहा वर्षांनीं पुत्र झाला. त्यांचे नांव विठ्ठलराव यांनीं रघुनाथराव * असें ठेविलें.

विठ्ठलराव नरसिंह यांची तिसरी स्त्री गंगाबाई ही जिवंत असतांच त्यांनीं मशिदीचें रांजणगांव येथील कुळकर्णी श्रीपतराव, यांचे नातीशीं लग्न केलें. या श्रीपतरावांनीं, गणपतराव रांझेकर हे होळकरांचे दिवाण असतां, त्यांचे हाताखालीं काम केलें होतें. विठ्ठलरावांच्या या स्त्रीचें नांव लक्ष्मीबाई असें ठेविलेलें होतें. त्यांस दोन पुत्र व तीन कन्या झाल्या. वडील पुत्राचें नांव कृष्णराव धाकटे पुत्राचें नांव माधवराव; वडील कन्या गयाबाई, दुसरी वहिणाताई, व तिसरी वेणुताई, याप्रमाणें त्यांचीं नांवें होतीं.

विठ्ठलराव नरसिंह यांची स्त्री लक्ष्मीबाई कायम असतांच त्यांनीं पांचवें लग्न गिजरे या आडनांवाचे गृहस्थाचे कन्येशीं केलें. त्या बाईचें नांव सत्यभामाबाई आहे. त्यांस संतान मुळींच झालें नाहीं. त्या अद्यापि विंचूर येथें असून सत्कालक्षेपकरीत आहेत.

विठ्ठलराव नरसिंह यांनीं धर्मकृत्यें केलीं तीं येणेंप्रमाणें:—त्यांचे पुर्वजांनीं नरहिंहपुर येथें जें कुलस्वामी नरसिंह याचें मंदीर बांधिलें होतें त्याजपुढें त्यांनीं बहुत पैसा खर्च करून प्रल्हादाचे मंदिरापर्यंत मोठा लांकडी सभामंडप बांधिला. त्याचप्रमाणें त्यानीं पूर्वद्वारींहीं लांकडी सभामंडप बांधिला. शिवाय, पश्चिमेकडील माहाद्वाराच्या बाजूस जो एक बुरूज पूर्वीं शिवाजी विठ्ठल यांनीं बांधिला होता त्याज्या समूर व त्या द्वाराच्या उत्तर बाजूस विठ्ठलराव यानी एक नवीन बुरूज त्याच्या मुकबल्याचा बांधिला. शिवाय, नीरानदीच्या कांठीं एक घाट बांधिलेला होता त्यास पाण्याच्या धक्क्यानें इजा न व्हावी ह्मणून त्यांनीं त्या घाटालगत व लक्ष्मी-

---

* हेच सरदार हाली विंचूर संस्थानचे माळीक आहेत.

तीर्था नजीक एक मजबूत बुरूज बांधिला. हीं त्याची सर्व कामें अद्याप पर्यंत कायम् आहेत.

पूर्वीं विंचूर येथें पाण्याचा मोठा तोटा असल्यामुळें तेथील लोकास पिण्याचे पाणी अर्ध कोशावरून आणावें लागत असे. हि गैरसोय नाहींशी कर्ण्यास्तव विठ्ठलराव यांनीं विंचुरापासून एक कोशावर पश्चिमेचे बाजूस एक मोठी विहीर पाहिली आणि मोठ्या खर्चानें नळ बांधून त्या विहिरीचें पाणी गांवांत आणिलें. इतक्यांत त्यांस देवाज्ञा झाली त्यामुळें तें काम बंद पडलें; परंतु त्यांचे चिरंजीव रघुनाथराव यांनीं टिकठिकाणी हौद बांधून सर्व गांवास पाण्याचे त्रासापासून मुक्त केलें.

नाशिक येथें रघुनाथभटजी म्हणून प्रसिद्ध सिद्ध पुरुष होउन गेले. त्यांची कीर्ती हाल्लीं सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यांस राहाण्याकरितां विठ्ठलराव यांनीं गोदातीरीं एक उत्तम बंगला बांधून दिला. पुढें त्या सत्पुरुषापासून त्यांनीं उपदेश ग्रहण केला, आणि सर्व काल हरिहराची पुजा करून वेदांतविचारांतच आयुष्याचे दिवस घालविले. नंतर थोडे दिवसांनीं त्यांनीं रघुनाथभटजीचे हस्तें विंचूर व सायखेडें या गांवांचे जमिनींपैकीं भूमिदानें वगैरे धर्म कृत्यें करविलीं; तीं निर्वेध चालली आहेत. पुढें भटजी माहाराज हे सन्यास करून माघ वद्य चतुर्दशी म्हणजे शिवरात्रीचे दिवशीं समाधिस्थ झाले. त्यांचें उत्तरकृत्य, नारायणबळी, वगैरे विठ्ठलराव यांनीं बहुत पैसा खर्च करून करविलें. त्याचप्रमाणें त्यांची वार्षिक पुण्यतिथी, महालय, समाधीचा पूजानैवद्य वगैरेचे खर्चास विठ्ठलराव यांनीं सालिना चारशे रुपयांची नेमणूक करून दिली. ती या वेळेपर्यंत त्यांचे चिरंजीव रघुनाथराव यांनीं चालविली आहे.

वर लिहिलेले रघुनाथ भटजी यांचें नारायणबावा म्हणून शिष्य होते; त्यांस आपले गुरूपासून हटयोग साध्य झाला होता. त्यांची सेवा विठ्ठलराव यानीं बहुत केली आणि बहुत पैसा खर्च करून त्यांस योगाभ्यासाकरितां मालेगांवानजीक दाभाडी या नांवाचे

गांवांत एक मठ बांधून दिला. त्या मठांत नारायणबावा यांनीं विष्णूची मूर्ती स्थापन केली. त्या देवास विठ्ठलराव यानीं, पूजा नैवेद्य वगैरेचे खर्चाकरितां, नेमणूक करून दिली. ती हालीं चालत आहे.

पेशवाई अमलांत विठ्ठलराव व आबासाहेब पुरंदरे यांचा परस्परें बहुत स्नेह होता. पुढें इंग्रजी अंमल झाल्यावर आबा साहेब पुरंदरे हे दत्तक घेऊन परलोकवासी झाले. त्यांचे पश्चात, त्या दत्तपुत्राकडे एल्फिन्स्टनसाहेब कमिशनर यांनीं कांहींच सरंजाम चालविला नाहीं. हें विठ्ठलराव यांस बरें न वाटून त्यांनीं पुरंदरे यांचे दत्तपुत्रास कांहीं तरी सरंजाम चालविण्याविषयीं आपले दोस्त जनरल स्मिथ साहेब यांजकडून त्या वेळचे गव्हरनर मालकम् साहेब यांस बहुत सिफारीष करविली, व स्वतःही बहुत प्रकारें उद्योग केला. त्यावरून मालकम् साहेबांनीं पुरंदरे यांचे दत्तकास पंचवीस हजार रुपयांचा सरंजाम चालविण्याविषयीं विलायत सरकारास चांगली सिफारीष केली. ती सिफारीष मान्य होऊन तितका सरंजाम पुरंदरे यांचे दत्तकाकडे चालवि-ण्याविषयीं कोर्ट अफ् डिरेक्टर्स यांजकडून ठराव होऊन आला. त्याप्रमाणें आबा साहेब पुरंदरे यांचे दत्तकाकडे तो सरंजाम ताहयात चालून हालीं त्यांचे दत्तकास त्या सरंजामाचा कांहीं भाग वंशपरंपरा चालत आहे.

अण्णासाहेब ढमढेरे यांशींही विठ्ठलराव यांचा बहुत स्नेह होता. एके समयीं अण्णासाहेब यांजवर बाजीराव साहेब यांची इतराजी झाल्यानें ढमढेरे यांची सर्व उत्पन्नें जप्त झालीं. त्या संकटसमयीं विठ्ठलराव यानीं कितीएक वर्षेंपर्यंत ढमढेरे यांचे पदरचे मंडळीचा व त्यांचे प्रपंचाचा सर्व प्रकारें गुजारा चालविला. पुढें अण्णासाहेबांचे चिरंजीव आबासाहेब ढमढेरे यांस विठ्ठलराव यांनीं आपलें आश्रित समजून आपले खासगी जाहगिरींतून निरंतर चालणारी अशी एक नेमणूक करून दिली. ती हालीं चालत

आहे. पूर्वीपासून ढमढेरे हें विंचूरकरांस आपले मालिकांप्रमाणें मान देत होते व हा क्रम अद्यापिही चालू असून पूर्ववतप्रमाणें ढमढेरे यांचे वंशजांबरोबर विंचूरकर घराण्याचा स्नेहसंबंध आहे.

विठ्ठलराव हे सन १८१५ इसवी सालापासून पेशव्यांचे वतीनें पेंढारी लोकांचे बंदोबस्ताकरितां आपले फौजेनिशीं कर्नल वालेस व जनरलस्मिथ यांजबरोबर खानदेशांत जात होते, त्यामुळें त्यांचा इंग्रज सरकारचे बहुत लष्करी व दरबारी हुद्देदारांबरोबर स्नेह संबंध जडून ते हुद्देदार त्यांस बहूमान देत असत. परंतु जनरल-स्मिथ साहेबांबरोबर त्यांचा विशेष ऋणानुबंध होता. त्यां संबंधानें झालेली एक गोष्ट उदाहरणार्थ आम्ही पुढें लिहितों. एके समयीं असें झालें कीं विठ्ठलराव यांनीं खानदेश व बागलाण या प्रदेशांत बहुत वाघ मारिलें, आणि त्यांच्या कातडयांचे दोन तंबू करून त्यां पैकीं एक तंबू त्यांनीं आपलेमालीक पेशवे यांस नजर पाठविला, आणि दुसरा जनरलस्मिथ यांस नजर केला. तो तंबु साहेबमौसूफ यांनीं मोठ्या आदरानें स्विकारून, वाघाच्या शिकारीस योग्य अशा दुनाली चापाच्या साहा बंदुका व कांहीं पिस्तुलें विठ्ठलराव यांस उलट नजर म्हणून पाठवून दिलीं. पुढें सन १८३२ इ. चे सुमारास जनरलस्मिथ साहेबांचे नौकरीची मुदत तमामहोऊन ते साहेब विलायतेस जाण्यास तयार झाले. त्या वेळेस विठ्ठलराव यांनीं पुणें येथें गारपिरावर कलेक्टरांचे बंगल्या नजीक मोठाले तंबू उभे केले आणि त्यांत बहुत उतम रोषनी करून साहेबमौसूफ यांस जाफत दिली. त्या प्रसंगीं त्यांनीं पुण्यांतील बहुतेक नेटीव बडे लोक व मडमांसह लष्करी व दरबारी साहेबलोक यांस त्या जाफतीस बोलाविलें होते. त्या समयीं आतषबाजी * बहुत सोडण्यांत आली. स्मिथ साहेब बहुत खुष होऊन विठ्ठलराव यांस म्हणालें किं,

* दारुकाम.

" तात्या साहेब! आजवर जे दिवस गेले ते आनंदांत गेले; परंतु आतां तुमचा माझा अगदीं वियोग होणार, येणें करून मला वाईट वाटतें. याजकरितां मी जाहाजांत बसून जाहाज चालतें होईतोंपर्यंत तुम्ही मजबरोबर असावें अशी माझी इच्छा आहे. विठ्ठलराव यांनीं जनरल मौसूफ यांचे इच्छे प्रमाणें कर्ण्याचें कबूल केलें. पुढें थोडकेच दिवसांनीं ते साहेब विलायतेस जाण्यास्तव मुंबईस गेले. त्या वेळेस विठ्ठलराव ही त्यांजबरोबर गेले. स्मिथ साहेब जाहाजांत बसले त्या वेळेस परस्परें मोठ्या प्रेमाचीं भाषणें होऊन शेवटीं उभयतांनीं पत्रद्वारें एकमेकास आपलें कुशल कळवीत जावें असें ठरविलें. नंतर परस्परें शेवटचा सलाम होऊन स्मिथसाहेबांचे जाहाज पश्चमेंकडे चालते झालें आणि विठ्ठलराव विंचुरास परत आलें.

भाग तिसरा.

रघुनाथराव विठ्ठल यांचा वृत्तांत.

प्रकरण १.

मागील भागाचे अंती विठ्ठलराव नरसिंह उर्फ तात्यासाहेब विंचूरकर यांचें चरित्र समाप्त झालें. आतां त्यांचे वडील पुत्र रघुनाथराव उर्फ अंणासाहेब विंचूरकर यांचा वृत्तांत आम्हीं सादर करितों.

रघुनाथराव यांचा जन्म सन १८२४ इसवी म्हणजे शके १७४६ सालीं झाला. तात्यासाहेब यांस हा पुत्र प्रथमच झाला असल्यामुळें त्यांनीं पुत्रोत्साह मोठ्या समारंभानें केला.

पूर्वी दक्षिणेंत इंग्रजी अंमल होण्याचे धालमेलींत तात्यासाहेब यांचे जवाहीरखान्यावरील कारकुनांनीं त्यांतील पुष्कळ जवाहीर काढून नेलें होतें. ही लबाडी रघुनाथराव यांचा जन्म होण्यापूर्वी तात्यासाहेब यांस कळली नव्हती; परतु त्यांचे जन्माचे संध्धीस ती त्यांस कळल्यावरून त्यांनीं त्याबद्दल चौकशी चालविली. तीचे अंती चोरीस गेलेल्या जवाहीरपैकीं सरासरी पाऊण लाख रुपयांचे किमतीचे जवाहिराचा ठिकाण लागून तें पुनः जवाहीरखान्यात ठेवण्यांत आलें. त्यावरून पुत्रजन्माचा शकून आपल्यास लाभदायक आहे असें तात्यासाहेब यांस वाटून त्यांस मोठा आनंद झाला.

रघुनाथराव यांचे वय तीन वर्षांचें झाल्यावर दुर्दैवें करून सन १८२७ इसवी सालीं त्यांचे मातुश्रीस देवाज्ञा झाली. पुढें त्यांचें संगोपन तात्यासाहेब यांनींच केलें. ते चार वर्षांचे झाल्यावर सन १८२८ इ० सालीं त्यांचे नांव पहिल्या प्रतीचे सरदारांचे

पटांत दाखल करण्यांविषयीं तात्यासाहेब यांनीं सरकारास विनंती लिहिल्यावरून सरकारानें तसें करण्यांविषयीं आपले पुणे येथील एजेंट यांस हुकूम पाठविला.

त्याच वर्षी तात्यासाहेब यांची चौथी स्त्री लक्ष्मीबाई यांस प्रथम पुत्र झाला आणि त्याचे मागून चार वर्षांनीं दुसरा पुत्र झाला. पैकीं वडील पुत्राचें, कृष्णराव व धाकट्याचें, माधवराव, अशीं नांवें त्यांनीं ठेविलीं.

सन १८३२ इसवी सालीं तात्यासाहेब यांनीं रघुनाथराव, यांचा वृतबंध करून त्यांचे पदवीस जो विद्याभ्यास योग्य तो त्यांजकडून करविण्यास आरंभ केला.

सन १८३५ इ० सालीं तात्यासाहेब यांनीं कृष्णराव यांचा वृतबंध केल्यावर लौकरच वडील पुत्र रघुनाथराव यांचें लग्न केलें. हा शरीर संबंध शिंद्यांचे पदरीं गणपतराव भाऊ खटावकर म्हणून एक नामांकित व श्रीमान गृहस्थ होते त्यांजबरोबर झाला.

परंतु ह्या घराण्याच्या दुर्दैवामुळें तात्यासाहेब यांस सन १८३६ इसवीचे जान्युआरी महिन्यांत माथेशुळाचे आजारानें एकाएकीं देवाज्ञा झाली. त्यांचे उत्तरकार्य त्यांचे जेष्ट पुत्र रघुनाथराव यांनीं गोदातीरीं केलें.

ह्या दुखदायक गोष्टी विषयीं नाशिक येथील त्यावेळचे सब्-कलेक्टर मिस्तर रिव्हज् यांनीं सरकारास रिपोर्ट करून त्यांत कैलासवासी तात्यासाहेब यांचे तीन पुत्रांची नांवें व उमरी कळविल्या आणि त्यांजकडे जे इनामीं व सरंजामीं गांव, वतनें व हक्क चालत होते त्यांची व्यवस्था कशी करावी म्हणोन सरकारास विचारिलें. त्याचे जबाबांत सरकारानें मिस्तर रिव्हज् यांस कळविलें कीं, " मरहूम * तात्यासाहेब यांजकडे जें कांहीं चालत होतें तें सर्व त्यांचे वडील पुत्र रघुनाथराव यांजकडे चालविण्याचे बाबदींत कौन्सिलांत विचार चालू आहे, याकरितां

---

* कैलासवासी.

तुम्हीं त्यांचे पुत्रांचे भेटीस जावें, आणि आपले वडील हक्क * झा-
ल्यामुळें सरकारास बहुत अफ्सोस् † झाला आहे व आपले
वडिलांकडे सरंजाम वगैरे जें कांहीं चालत होतें तें आपणांकडे
चालविण्याविषयीं ठराव होऊन तो पुणे येथील एजेंट यांचे मार्फत
आपल्यांस लौकरच कळविण्यांत येईल, असें त्यांस सांगून त्यांचें
समाधान करावें." त्याबरहुकूम् मिस्तर रिव्हज् यांनीं सायखेडें
येथें रघुनाथराव यांचे भेटीस जाऊन सरकारचे पत्रांतील मजकुर
त्यांस समक्ष कळविला.

रघुनाथराव आपले वडिलांचें उत्तरकार्य करून विंचुरास
परत आल्यावर त्यांनीं दौलतीचे पुरातन कारभारी कृष्णाजी शा-
मराव यांजबरोबर पुण्यास जाऊन सरदार लोकांबद्दलचे एजेंट
यांची भेट घेतली. पुढें लौकरच सरकारानें रघुनाथराव यांचें
नांवानें सरंजाम वगैरे चालविण्याचे बाबदींत ठराव करून ते
कायद्याचे वयांत येत तोंपर्यंत दौलतीचा कारभार चालविण्यास
एक योग्य गृहस्थ नेमण्याविषयीं व त्यांस दुखवटयाबद्दल शाल-
जोडी देण्याविषयीं एजेंट साहेब यांस हुकूम पाठविला. त्याबरहु-
कूम एजेंटसाहेबांनीं आपले कारकुनाबरोबर रघुनाथराव यांजकडे
एक पत्रासह एक शालजोडी पाठवून दिली. सदर्हू पत्र वाच-
कांचे माहिती करितां आम्हीं पुढें दाखल करितों.

" रावसाहेब मुष्फक् मेहेरबान करम फर्माय
दोस्तां रघुनाथरावजी विंचूरकर उम्देतुल मु-
ल्क बाहादूर सल्महु.

अज्जीसीब अलेक्झांडर बेलसाहेब बाहादूर, एजेंट जिल्हा
दक्षिण. सलाम् बादज सलाम् खैरियत अंजाम आंके येथील खैर
सला जाणून आपली षादमानी हमेषा कलमीं करीत असलें पा-

* मृत.
† दुःख

हिजे. दरीं विला, आंसाहेबांनीं चंद्र २२ रम्ज़ान् सन १२४५ फस्लीचें खत पाठविलें तें पावलें. मरहूम विठ्ठलराव तात्यासाहेब यांचा इंतिकाल झाला हें ऐकून फार अब्सोस् झाला. तो कलमीं करितां येत नांहीं. हक्ताल्लाचे मर्जी पुढें इन्सानाचा इलाज नांहीं हें दिलांत ठेवून अब्सोस् सोडून दिला पाहिजे. आंसाहेबांनीं खत इबलाग केलें त्याचा तरजमा करून सय्यद मुस्ताब् मौलाअलकाब राइट आनरेबल गव्हरनर दर इजलास् कौन्सिल जंजीरे मुंबई यांचे हुजुरांत गुजराविला. त्याचा जबाब तारीख २९ माहे फेब्रुआरी सन १८३६ इसवीचा इंजानिबांचे नांवें आला. त्यावरून कलमीं करण्यात येत आहे जे मरहूम् तात्यासाहेब यांजकडे सरंजाम चालत होता तो दरोबस्त आंसाहेबांकडे चालवावा म्हणोन मेहेरबान प्रिन्सिपल कलेक्टर साहेब सुभा पुणें व कलेक्टर सुभा अहंमदनगर व खान्देश यांस आलाहिदा हुकूम सादर झाले आहेत, व कौन्सिलचे हुकुमाप्रमाणें आंसाहेबांस दुखवट्याबद्दल शालजोडी १ एक नारोलक्ष्मण कारकून याजबरोबर पाठविली आहे; पावल्याचें उत्तर कलमीं केलें पाहिजे. व आंसाहेबांचे वय दौलतीचा बंदोबस्त राखण्यास योग्य होईतों पर्यंत दौलत संरक्षण करण्यांस व सरंजामाची वहिवाट करण्यास हरकोणीं इमानीं व हुशार षख्स याची नेमणूक करावी म्हणून इंजानिबांस कौन्सिलांतून फर्माविलें आहे व आंसाहेबांचे नांवें येविषयीं गव्हरगनर इनकौन्सिल साहेब यांचे खत मागाहून सादर होईल तें आपल्याकडे पोंहोंचविलें जाईल. तारीख ११ माहे मार्च सन १८३६ इसवी. सुर्सन सित सलासीन मयातैन व अल्लफ. जियादा काय लिहिणें प्यार मोहोबत असों दिज्ये हे किताबत्.

(सही इंग्रजी) अलेक्ज़ांडर बेल

एजेंट.

जरी सरकारानें पत्रांत कळविल्याप्रमाणें विंचूर संस्थानचा कारभार चालविण्यास एक नवीन इसम नेमण्या विषयीं एजेंट साहेब यांस हुकूम पाठविला होता तरी त्या साहेबांनीं तसें न करितां पुरातन कारभारी यांसच त्याकांमावर मुकरर केलें. याबाबदींत कारभारी कृष्णाजी शामराव यांस पत्र आलें तें येणेंप्रमाणेः—

मेहेरबान दोस्तां कृष्णाजी शामराव निस्बत् विंचूरकर सलमहु.

अर्जीसीब अलेकजांडर बेल साहेब बाहादूर एजेंट जिल्हा दक्षिण. सलाम आंके दरिंविला, राइट आनरेबल गव्हरनर इन् कौन्सिल साहेब यांचा हुकूम तारीख २९ माहे फेब्रुआरी सन मजकूरचा आला, त्यांत इंजानिबांस फर्माविलें आहे जे रघुनाथराव अंणासाहेब यांची प्रस्तुत कम उमर आहे तों पर्यंत त्यांची जिनगी, सरंजाम्, इनाम, जाहागीर, वतन वगैरेची वहिवाट करण्यास कोणीं षख्स प्रौढ व खैरख्वाह असेल त्याची योजना करावी. त्यावरून आपण प्राचीन त्यांचे पदरचे व खैरख्वाह ह्मणून त्या कांमावर आपली योजना करून कलमीं केलें जातें जे सदर्हूची वहिवाट मर्हूम तात्यासाहेब यांच्या कारकिर्दींत चालत होती त्याप्रमाणें चालवावी व खर्चांत कसोशी करावी, व जम्मे पेक्षा खर्च बिलकूल जास्ती होऊं देऊं नये, व जम्मा वसूल बाकीचे हिशेब जंजीरबंद राखावे; पदरची मंडळी कायम ठेवावी; सरकारातून हुकूम होत जातील ते साफ बजावीत जावे; अंणासाहेब यांची उमर दौलतीचा बंदोबस्त कर्ण्यास योग्य झाल्यावर आपले वहिवाटीचे कागद पत्र ,हिशेब, वगैरे सुद्धा त्यांचे हवालीं करावे; व या कांमाबद्दल आपल्यांस कांहीं तैनात द्यावी असें नजरेस आल्यास त्याचा विचार आयंदां केला जाईल. तारीख

१९ माहे मार्च्य सन १८३६ इसवी. जियादा काय लिहिणें हे किमावत.

(सही इंग्रजी) अलेक्जांडर बेल
एजेंट.

या प्रमाणें सर्व व्यवस्था लागल्यावर रघुनाथराव हे कारभारी मौसूफ यांजबरोबर विंचुरास परत गेले.

रघुनाथराव यांनीं आपले वडिलांचे हयातींत मराठी बाळबोध व मोडी लिहिण्या वाचण्याचा व हिशेब वगैरे कारकुनी विद्येचा अभ्यास चालविला होताच. तो अभ्यास कारभारी मौसूफ यांनीं त्यांजकडून पुढें चालवून शिवाय फारसी लिहिण्या वाचण्याचाही अभ्यास सुरू करविला; आणि त्याचप्रमाणें त्यांजकडून घोडा फेरणें, बोथाटी करणें, बंदुकेनें निषाण मारणें, व तिरंदाजी करणें यांचाही मोठा रफ्त करविला. तेणेंकरून ते तीन चार वर्षांत चांगले तरबेज झाले. या शिवाय, रघुनाथराव यांनीं स्वइच्छेनें संस्कृताचाही बराच अभ्यास केला, त्यामुळें काव्यांत त्यांची चांगली गती होऊन ते विस्पंन्न झाले.

रघुनाथराव यांचे कनिष्ट बंधू कृष्णराव हेही त्यांचे समागमानें घोड्यावर बसण्यास चांगले शिकून फेरफटका करूं लागले. शिवाय, त्यांची सख्खी मातुश्री लक्ष्मीबाई यांनीं त्यांस सुशिक्षा देवविल्यामुळें त्यांनीं कारकुनी विद्याही चांगली संपादन केली.

सन १८३८ इसवी सालीं रघुनाथराव यांनीं आपले कनिष्ट बंधू माधवराव यांचा वृतबंध केला आणि मागाहून दुसरे बंधू कृष्णराव यांचें लग्न केलें.

माधवराव यांचे वाणीस लाहानपणापासून पुष्कळ खलदगी होती आणि ते भक्तीमार्गांत असल्यामुळें त्यांजकडून व्हावा तसा विद्याभ्यास झाला नाहीं. तथापि ते पुढें समजुतीचे वयांत आल्यावर त्यांनीं स्वइच्छेनें व्यवहाराचे उपयोगीं पडण्या जोगा विद्याभ्यास

केला. ते लग्नास योग्य झाल्यावर रघुनाथराव यांनीं त्यांचें लग्न केलें.

वर लिहिलेल्या सर्व गोष्टी रघुनाथराव यांनीं आपले खानदानीचे नांव—लौकिकाप्रमाणें चांगले प्रकारें केल्या. याच सुमारास त्यांची पत्नी वयांत आली आणि ती त्यांचे आज्ञेप्रमाणें वागूं लागल्यानें त्यांस सर्व प्रकारें प्रापंचातील सुखप्राप्ती होण्याचा संभव दिसूं लागला; परंतु दुर्दैवेंकरून त्या सुखास व्यत्यय येऊन त्यांची स्थिती अत्यंत दुःखदायक झाली. त्याचीं कारणें पुढें लिहितों.

१ घरांत दोन सापत्न माता व दोन सापत्न बंधू होते ते त्यांजबरोबर स्पर्धा करित असत.

२ कारभारी हे केवळ जुन्या चालीचे असल्यामुळें दौलतींत जशी दक्षता ठेवणें जरूर होतें तशी दक्षता त्यांजकडून राहात नसे.

३ अशा वगैरे अडचणींस्तव त्यांनीं स्वतः दौलत संभाळण्याकडे विशेष लक्ष पुरविणें योग्य होतें; परंतु त्यांचे वय लाहान असून त्यांचे मनाचा विशेषकल स्नानसंध्येकडे असल्यामुळें त्यांचे लक्ष त्या गोष्टी कडे फारसें गेलें नाही. यामुळें त्यांबरोबर स्पर्धेनें वागणारांस आपले मतलब साधण्यास सवड सांपडली.

४ तशांत कारभारी यांची एक कंन्या वधू होती, ती आपल्यास देण्याची त्यांची इच्छा आहे असें रघुनाथराव यांस समजल्यावरून त्यांस असें वाटलें कीं आपणास ममतेचें म्हणून स्वस्त्री खेरीज दुसरें कोणीच नांहीं, याकरितां आपण कारभारी यांचे कंन्येबरोबर विवाह केला तर त्या शरीरसंबंधाचे योगानें त्यांस आपले (जांवई यांचे) कल्याणाची आस्था लागून आपणांस त्यांचे चांगलें साहाय होईल. हें आपलें हृद्गत रघुनाथराव यांनीं स्वस्त्रीस कळविल्यावर तिनें ही स्वसंतोषानें त्या विवाहास रुकार दिला. नंतर त्यांनीं कारभारी यांस बोलाविलें आणि त्यांजबरोबर विवाहाचा निश्चय करून तो लौकरच केला. रघुनाथराव यांस पूर्वी वाटलें होतें त्याप्रमाणें कारभारी यांस त्यांचें हीत रक्षण करण्याची

अधिक आस्था प्राप्त झाली. परंतु तेणेकरून रघुनाथराव यांची सापत्न मातुश्री लक्ष्मीबाई व सापत्न बंधु कृष्णराव यांचे मनांत विषाद उत्पन्न होऊन दिवसान्दिवस त्यांचें वैमनस्य अधिकाधिक वाढत चाललें आणि शेवटीं तें अशा थरास गेलें कीं त्या मातुश्रीनी संस्थानचे तीन हिस्से करून देण्यांविषयीं एजेंटसाहेबांकडे यादी गुजराविण्याचा उद्योग चालविला.

५ त्यांची कनिष्ट मातुश्री सत्यभामाबाई ही आपले भ्रताराचे देहांता नंतर आपले माहेरीं जाऊन राहिली होती. त्या बाईनें रघुनाथराव यांस असें कळविलें कीं, " माझी आतां एकत्र राहण्याची खुषी नांहीं. याकरितां मला निराळी नेमणूक तोडून द्यावी. " रघुनाथराव हे आपले घराण्याचे मागील वहिवाटीप्रमाणें व आपले उत्पन्नाचे मानानें त्या बाईस पृथक नेमणूक करून देण्यास तयार झाले; परंतु ती तेव्हडयानें संतुष्ट न होऊन अधिक मोठी नेमणूक मिळण्यास्तव तिनें रघुनाथराव यांजवर दिवाणींत दावा केला.

या संधीस कारभारी यांस अर्धांगवायुचा उपद्रव होऊन त्यांचे आंगीं कारभार करण्याचें सामर्थ्य नांहींसें झालें. सबब दौलतीची सर्व व्यवस्था पाहाणें अर्थातच रघुनाथराव यांचे आंगावर पडलें. त्यांनीं दौलतिचे स्थितीचा विचार केला तों त्यांस असें आढळलें कीं वडिलांचे अंतकाळीं संस्थानचे खजिन्यांत जी रोकड शिलक होती ती कारभारी यांनीं दरोबस्त खर्च करून उलटें किरकोळ देणें करून ठेविलें होतें; त्याच प्रमाणें जमाखर्चाचे हिशेबांत ही सर्व घोंटाळाच झालेला होता; जवाहीरखाना संभाळण्यास जरी पुष्कळ कामगार होते, तरी आपसांतील कलहामुळें खासे मंडळी पैकीं ज्याचे हातीं जो डाग लागला तो त्यानें आपणास मालिक समजून आपले कबजांत ठेविला होता; आणि पदरचे मंडळींत सुध्धा ऐक्य नांहींसें झालें होतें; त्यामुळें त्यांजकडे थोडे लोक राहून बाकीचे सर्व त्यांचे उभयतां बंधूंचे पक्षाकडे मिळाले होते.

अशा बेबंदीचे स्थितींत सापत्न मातुश्री लक्ष्मीबाई यांनीं आपले उभयतां पुत्र अज्ञान असल्याचे सबबेनें आपण त्यांची पाळन करणारी म्हणून संस्थानचे तीन निराळे हिस्से होण्यास्तव पुणे येथील सरदार लोकांबद्दलचे ऐजेंट यांजकडे यादी गुजराविली. सदर्हू यादींत दोन मुख्य तक्रारी होत्या. पैकीं पहिली तक्रार अशी कीं कारभारी यांची कन्या रघुनाथराव यांस दिलेली असल्यामुळें ते त्यांचे तर्फेनें वर्तन करितात; दुसरी तक्रार अशी कीं आम्हीं आज पर्यंत एकत्र राहिलों; परंतु आतां आमचें बनत नाहीं, याकरितां सरंजामाचे तीन हिस्से करून आमचे दोन हिस्से अमचे ह्वालीं करावे.

ह्या सर्व तंटयाचे कारण विंचूरकर घराण्याचा वकील गोपाळ भास्कर परांजपे हाच आहे असें एजेंट साहेब यांस वाटल्यावरून त्यांनी वकीलमजकूर यास आपल्याकडे येण्याची मनाई केली. त्यावरून त्यानें रघुनाथराव यांस पुण्यास सत्वर येण्यांविषयीं कितीएक पत्रें पाठविलीं; परंतु त्यांस त्यावेळेस पुण्यास जाण्यास मोठी अडचण होती, कारण, एक तर, संस्थानांतील घोडीं, माणसें, वगैरे यांजवर तीन पक्षांचे तीन प्रकारचे हुकूम होत होते, त्यामुळें त्यांचा हुकूम सर्वांवर बरावर चालत नव्हता; दुसरें, त्यांचें वय केवळ १८ वर्षांचेंच असून दरबारचे कामकाजाची त्यांस चांगलीशी माहितगारी नव्हती; तीसरें, त्यांचे वर लिहिलेले वकीलास एजेंट साहेबांचे कचेरींत जाण्याची मनाई झाली असल्यानें त्यांजबरोबर जाण्यांस जुना माहितगार असा कोणीच मनुष्य राहिला नव्हता. अशा अडचणीचे प्रसंगीं पुढें काय करावें हें रघुनाथराव यांस सुचेनासें झालें. तत्रापी आपले पिढीजादे नौकर भाऊ पोतनीस, जे त्यावेळेस ग्वाल्हेरीस होते, त्यांस बोलावून घेतलें असतां ते सर्व बखेडे मोडून टाकतील असें त्यांस वाटल्यावरून त्यांनीं त्यांस विंचुरास येण्यांविषयीं कित्येक पत्रें पाठविलीं. या पत्रव्यवहारांतच एक वर्ष गुजरून गेलें; परंतु पोतनीस यांस

ग्वाल्हेर येथें शिंदे यांचे पदरी कांहीं रोजगार असल्यामुळें विंचुरास त्यांचें येणें झालें नांहीं. शेवटीं रघुनाथराव यांनीं स्वतः पुण्यास जाऊन एजेंटसाहेब यांची भेट घेतली आणि आपले स्थितीची सर्व हकीकत त्यांस समक्ष कळवून आखेरीस असें सांगितलें कीं, " आमचे दौलतींत आज पर्यंत हिस्से म्हणून कधीं ही झाले नांहीत. याउपर आपल्यांस जसें योग्य वाटेल तसें आपण करावें. मी आपला हुकूम संतोषानें कबूल करीन. " या निस्पृहतेच्या बोलण्यानें एजेंटसाहेबांस संतोष वाटून ते त्यांस म्हणाले कीं, " मी तुमचे बोलण्याचा पुर्तेपणें विचार करून नंतर जें करणें तें करीन. "

रघुनाथराव यांचे मागून त्यांची आपली मातुश्री लक्ष्मीबाई ही आपले उभयतां पुत्र कृष्णराव व माधवराव यांसह पुण्यास गेली होती. त्याउभयतांनीं ही एजेंट साहेबांस पुष्कळ तक्रारी कळविल्या.

पुढें एजेंट साहेबांनीं रघुनाथराव यांस एके दिवशीं समक्ष सांगितलें कीं, " या बाबदींत मला सरकारास जें ल्याहावयाचें आहे तें मी लिहीन आणि त्याजवर सरकारचा जो हुकूम येईल तो मी तुह्मास मागाहून कळवीन. " नंतर रघुनाथराव यांनीं त्या साहेबांपाशीं विंचूरास जाण्यास रजा मागितली. तेव्हां साहेब त्यांस ह्मणाले कीं, " आपण आजवर आपले संस्थानचे कांमकाजांत मन घातलें नाहीं, याकरितां एक वर्ष पर्यंत आपले दौलतीचा कारभार करण्यास कोणीं तरी हुशार व योग्य गृहस्थ असला पाहिजे. या मुदतींत आपण खूब मेहेनत करून संस्थान संभाळण्या जोगी तयारी करावी. ढमढेरे यांचे घराण्याशीं आपले घराण्याचा पूर्वापार स्नेह-संबंध आहे, याकरितां रामचंद्र पांडुरंग उर्फ आबासाहेब ढमढेरे यांस आपले दौलतींत एकवर्षभर कारभारी नेमावें असें माझे मनांत आहे. " हें सर्व ह्मणणें रघुनाथराव यांनीं कबूल केल्यावर एजेंटसाहेब यांनीं त्यांस विंचु-

रास जाण्यास रजा दिली. त्याप्रमाणें ते दुसरे दिवशीं विंचुरास गेले; परंतु त्यांची सापत्न मातुश्री आपले पुत्रांसह पुण्यासच राहिली.

पुढें लौकरच एजेंट साहेबांनीं हमडेरेमौसूफ यांस विंचूरचे दौलतीचा कारभार पाहाण्यास एक वर्ष पर्यंत नेमून त्याबाबद त्यांस पत्र लिहीलें आणि त्या पत्राची नकल रघुनाथराव यांजकडे पत्रा सोबत पाठवून दिली. हमडेरे यांनीं लक्ष्मीबाई व त्यांचे पुत्र कृष्णराव व माधवराव यांस बरोबर घेतलें आणि विंचुरास जाऊन तेथें दौलतीचा कारभार हातीं घेतला. तेथील दिवाणी कोर्ट बहुत दिवस बंद असल्यामुळें दिवाणी कामें फार तुंबलीं होतीं; परंतु हमडेरे कारभारी यांनीं पुष्कळ श्रम घेऊन त्या सर्व कामांचे निकाल सत्वर लाविले.

रघुनाथराव यांस कळविल्याप्रमाणें एजेंटसाहेब यांनीं त्यांचे बावदींत सरकारास रिपोर्ट केला. त्याचा जबाब आल्यावर त्यांनीं रघुनाथराव यांस तारीख १० माहे जून सन १८४३ इसवीचे पत्रानें असें कळविलें कीं, "आपण विंचूर संस्थानचे मालिक आहां; परंतु आपली सापत्न मातुश्री व सापत्न बंधू यांचे खुराकी पोषागी* बद्दल आपणास जो ऐवज द्यावा लागेल त्याचे ऐवजीं त्यांस गांव तोडून देऊन त्यावदल त्यांस सनद करून द्यावी. ही सनद वाफस† घेण्यास व गांव परत घेऊन नक्त नेमणूक ठरवून देण्यास आंसाहेब मुखत्यार आहेत. सदर्हू खुराकी पोषागीबद्दल रकमा ठरवून आपणास आलाहिदा कळविण्यांत येईल. याप्रमाणें सरकारचा हुकूम आला तो आपल्यांस कळविला आहे." यापत्राची नक्कल आम्ही वाचकांचे माहितीस्तव पुढें दाखल करितों.

---

* अन्नवस्त्र.

† परत.

नंबर ४९१

रावसाहेब मुष्फक् मेहेरेबांन करम् फर्माय दोस्तां रघुनाथराव अंणासाहेब विंचूरकर उमदे तुल मुल्क् बाहादर सलमहु.

अर्जीसौब आलिषाम् जान वार्डनसाहेब बाहादूर एजेंट जिल्हा दक्षिण. सलाम् बादज् सलाम् खैरियत् अंजाम आंके येथील खैरसल्ला जाणून आपली यादमानीं हमेषा कलमीं केली पाहिजे. दरींविला, आपले वडिलांकडे सरंजाम चालत होता तो आपण व आपले बंधू मेहेरबान कृष्णराव बापूसाहेब व माधवरावदादासाहेब असे त्रिवर्ग बंधू यांजकडे बरोबर चालावा किंवा कसें याचा अंदेषा आल्यावरून नबाव मुस्तताब मौला अलकाब राइट आनरेबल गव्हरनरसाहेब बाहादूर दर इज्लास कौन्सिल यांचे हुजुरास याबाबें मजकूर लिहिला होता. याचा जवाब इंजानिबांचें नांवें आला जे सदहू सरंजाम तीन पुत्रांकडे चालवावा, ह्मणजे वडील पुत्र यांस सरंजाम असावा व त्यांनीं कनिष्ट बंधूंची परवरिष ययास्थित चालवावी. (त्याजवरून कलमीं कर्ण्यांत येतें कीं) सदहू सरंजामास आपण मुखत्यार आहां; परंतु आपली सापत्न मातुश्री व दोघे बंधू यांचे खुराकी पोषागी बद्दल जो ऐवज द्यावा लागेल त्याचे मुबादला गांव लावून द्यावा व त्या बद्दल त्यांचे नांवें सनद करून द्यावी. ती सनद वाफस् घेण्यास व गांव परत घेऊन नक्त नेमणूक ठरवून देण्यास आंसाहेब मुखत्यार आहेत. खुराकी पोषागी बद्दल बेरीज ठरवून आलाहिदा कळविण्यात येईल. मालूम होय. बतारीख ३० माहे जून सन १८४३ इसवी. सुर्सन आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. सन १२५३ फसली. जियादाकाय लिहिणें; प्यार मोहोबत असों दिज्ये हेकिताबत्.

(सही इंग्रजी) जानवार्डन

एजेंट.

या ठरावाची समज एजेंटसाहेब यांनीं, कृष्णराव व माधवराव यांस ही एक पृथक पत्रानें दिली.

याप्रमाणें आपसांतील तंट्याचा निकाल लागल्यावर सर्व कामें सुरळींत चालूं लागलीं. पुढें त्याचवर्षी रघुनाथराव हे उभयतां सापत्नबंधू व दमडेरे कारभारी यांस बरोबर घेऊन वार्षिक दरबारा करितां पुण्यास गेले. तो दरबार दसऱ्याचे दिवशीं एजेंट साहेब करीत असून त्यास जे दक्षिणेंतील सरदार येत त्यांस ते ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणें बहुमानाचे पोषाग देतहोते. * त्या दरबारांत रघुनाथराव व त्यांचे उभयतां सापत्न बंधू यांस शिरस्तेप्रमाणें पोषाग मिळाले.

सरकारच्या वर लिहिलेल्या ठरावा अन्वयें कृष्णराव व माधवराव यांस खुराकीपोषागी बद्दल रघुनाथराव यांजकडून ज्या नेमणुका देववावयाच्या त्या एजेंटसाहेब यांनीं ठरवून त्या बाबदींत कृष्णराव व माधवराव यांस पत्र लिहिलें.

हा ठराव रघुनाथराव यांस कळविण्यास्तव, कृष्णराव व माधवराव यांस आपण लिहिलेल्या पत्राची नक्कल साहेबमौसूफ यांनी त्याच तारिखेचे पत्रासोबत त्यांजकडे पाठवून दिली.

सदर्हू ठरावाप्रमाणें रघुनाथराव यांचे वर लिहिलेले नांवांचे बंधूं पैकीं प्रत्येकास फक्त सरंजामाचे उत्पन्नावर दर शेकडा रुपये ७॥ प्रमाणें मिळावयाचे, याकरितां सरंजामाचे वार्षिक उत्पन्नाचा अजमास करून एक नक्की रक्कम ठरविण्यास्तव एजेंट साहेब यांनीं कागद पत्राचे आधारानें चौकशी सुरू केली.

या संधीस रघुनाथराव यांनीं कनिष्ट बंधू कृष्णराव यांस एकांती बोलावून असे सांगितलें कीं, "आजवर जो व्यवहार घडला त्यास आतां इलाज नांहीं; परंतु आपण आतां जाणते

* हा दरबार पूर्वी दसऱ्याचे दिवशीं होतहोता; परंतु सन १८५७ इसवी सालापासून ती वहिवाट बंद होऊन पुढें तो केसरे-हिंद यांचे जन्माचे तारिखेस होऊं लागला. परंतु त्याआलिकडे सरकार जी तारिख नेमितील त्या तारिखेस तो होऊं लागला आहे.

झालों आहों, या करितां मागील वैमनस्य सोडून देऊन एक विचारें वागूं; म्हणजे लौकीक राहून आपलें हित ही होइल, कारण, वडीलांनीं जो लौकीक मिळविला याचें रक्षणकर्णें हें आपलें मुख्य कर्तव्य कर्म आहे." हें सांगणे कृष्णराव यांस पसंद वाटून त्यांनीं रघुनाथराव यांस जबाब दिला कीं, " आपण ह्मणतां हें अगदीं रास्त आहे. याकरितां मी यापुढें आपले विचारानेंच वागेन." याप्रमाणें उभयतां बंधूंचें ऐक्य झाल्याबर त्यांनीं एजेंट साहेबांची भेट घेऊन त्यांस कळविलें कीं, "आम्ही लाहान असतां आमचे दरमियांन वागणारे यांनीं आम्हां मध्यें कलह लावून दिला होता; परंतु कलहा पासून उभयतांचें ही नुकसान आहे असें आतां आम्हांस पक्कें समजून आलें आहे. याकरितां सरंजामाचे उत्पंनाचे मानानें नेमणूका ठरविण्यास्तव चौकशी चालू आहे ती रहित करावी." हें शाहाणपणाचें भाषण ऐकून एजेंट साहेबांस संतोष वाटला. मग त्यांनीं उभयतां बंधूस असें कळविलें कीं, "आपण उभयतांनीं एकविचारें वागण्याचें कबूल केल्यावरून तुर्त पक्या नेमणूका ठरवून देण्याचे तहकूब करण्यात येत आहे. पुढें कदाचित आपलें न बनेलतर त्याबद्दल विचार करण्यात येईल." नंतर साहेब मौसूफ यांनीं कृष्णराव व माधवराव यांस तारीख २० माहे आक्टोबर सन १८४३ इसवीचे पत्र लिहिलें तें असें;—

नंबर ७८१

रावसाहेब मुष्फक् मेहेरबान करम
फर्मायदोस्तां कृष्णराव बापू, व माधवराव दादा, साहेब विंचूरकर
उमदेतुल मुलुक बाहादर सलमहू.

अर्जी सौव जांन वार्डन साहेब बाहादूर एजेंट जिल्हा दाक्षिण सलाम बादज सलाम खेरियत अंजाम आंके येथील खेरसला जाणून आपली षादमानीं हमेषा कलमीं करीत असले पाहिजे. दरींविला, आंमेहेरबांनांस तारीख ३० माहे जून संन १८४३ रोजीं खुराकी

पोषागी बद्दल आयंदा ठराव होऊन कलमीं कण्यींत येईल म्हणून वगैरे मजकुराचें खत कलमीं झालें होतें, ऐशियास त्याबाबद इनाम, वतन, व वृत्ती खेरिज करून फक्त सरंजामांचे उत्पन्नावर दर शेंकडा रुपये १५ उभयतां मिळोन म्हणजे दर एकास साडे-सात रुपये शेंकडा व आपल्या दोन्ही मातुश्रचांस इनाम, वतन, वृत्ती व सरंजाम वगैरे एकंदर उत्पन्नावर दरशेंकडा रुपये १० प्रमाणें ह्मणजे दर एक बाईस शेंकडा रुपये ५ प्रमाणें मिळोन ठ-राव केला; परंतु आपण व मेहेरबान आंणासाहेब यांनीं एकीनें वागूं असें कबूल केलें सबब तूर्त सदरीं लिहिल्या अन्वयें बंदोबस्त केला नाहीं. आयंदां आपलें न बनेल तर वर लिहिल्या अन्वयें आपल्यास देणें विषयीं मेहेरबान आंणासाहेब यांस लिहून गेलें आहे. त्या विषयीं मागाहून हिशेब आणवून काय ठराव होईल ती बेरीज आयंदां कळविण्यांत येईल. मालूम् होय. तारीख २० माहे अकटोबर सन १८४३ इसवी. सुर्सन आर्बा आर्बैन मया-तैन व अलफ. जियादा काय लिहिणें प्यार मोहोबत असों दिज्ये हे कितावत्.

(सही इंग्रजी) जानवार्डन
एजेंट

पुढें थोडक्याच दिवसांनीं आबासाहेब ढमढेरे यांचे नेमणूकेची एक वर्षाची मुद्दत भरल्यावर त्यांनीं आपले कारकिर्दीसंबंधीं एजेंट साहेब यांस रिपोर्ट करून त्याचे शेवटीं " रघुनाथराव हे आपले संस्थान संभाळण्यास योग्य झाले आहेत, याकरितां त्यांस मुख्त्या-री द्यावी. " अशी सिफारिष लिहिली. त्याचे जबाबांत एजेंट साहेब यांनीं ढमढेरे यांचे आभार मानिले. *

ढमढेरे यांनीं वर लिहिलेला रिपोर्ट केला त्यावेळेस रघुनाथराव यांनीं ही एजेंट साहेब यांस पत्र लिहिलें होतें. त्याचा जबाब ए-

---

* विंचूरचें दफ्तर.

जेंट साहेब यांनीं पाठविला त्यांतील हांशिल कीं " आपण आपले दौलतीचें हरएक कांम चालविण्यास योग्य झालां आहां असें ढमढेरे यांचे रिपोर्टावरून दिसतें. याकरितां आपल्यास मुख्त्यारी देऊन इतकेंच सुचविण्यांत येतें कीं आपण आपले घराण्याची मनुष्यें व पदरची मंडळी यांचा सांभाळकरून गृहकलह न वाढूं देतां एक विचारें वागावें आणि रैयतपरवरिषीकडे * ही लक्ष ठेवावें. "

याप्रमाणें रघुनाथराव यांस आपले संस्थानची मुख्त्यारी मिळाल्यावर लौकरच त्यांस एजेंट साहेबांकडून दिवाणी अधिकाराची सनद मिळाली. तेणेंकरून त्यांस दिवाणी मोकदम्यांचे फैसले करण्याचा इतका मोठा अधिकार प्राप्त झाला कीं त्यांचे निवाड्यांवर अपील नव्हतें. शिवाय, पूर्वी दर महिन्यास, दर साहा महिन्यांनीं, आणि दर वर्षास दिवाणी फैसल्यांबद्दल सरकाराकडे हिशेब पाठवावे लागत होते तेही पाठविण्याची माफी झाली. खेरीज, आपले कोर्टांत आपले सहीचा छापील कागद चालवून त्याचे विक्रीचें उत्पन्न त्यांनींच घेत जावें असाही सरकारानें ठराव केला. अणखी, सन १८२७ इ० चा फौजदारी कायदा १५ प्रमाणें त्यांस फौजदारी अधिकार ही मिळाला.

याप्रमाणें रघुनाथराव यांस निरनिराळे अधिकार मिळाल्यावर सुदैवानें सर्व गोष्टी सुयंत्र चालूं लागल्या. मग आपले बंधू कृष्णराव यांस राजी ठेवण्यास्तव त्यांजकडे दिवाणी, फौजदारी, मुलकी, आणि दौलत संबंधीं सर्व कामें सोंपून देऊन ते स्वतः त्यांजवर देखरेख ठेवूं लागले. ही गोष्ट रघुनाथराव यांनीं प्रसन्न मनानें केली, सबब कृष्णराव हेही पुष्कळ श्रम करून वर लिहिलेलीं सर्व कामें योग्य रीतीनें करूं लागले. सरकारी कामकाजा संबंधीं त्यांनीं असा वर्तनक्रम चालविला कीं कोणतेही कामाबद्दल सरकारापर्यंत बोभाटा जाण्यास बिलकूल कारण राहिलें नाहीं. शिवाय, दर वर्षास सेशन ज्यडज्य यांस आदरानें बोलावून व स-

---

* प्रजेचें पालनाकडे.

दर अदालतीचे सर्कीट ज्यडज्य हे दौऱ्यावर (आपले अधिकाराचे हद्दींतील दिवाणी कोर्टींची पाहाणी करण्यास्तव) फिरत असतां विंचुरापासून थोडे अंतरावर आले ह्मणजे त्यांस मुद्दाम विंचूरास बोलावून आपले कोर्टांतील इन्साफाचे कागदपत्र त्यांस दाखवूं लागले. ते पाहिल्यावर ते अधिकारी खुष होऊन " आमचे अधिकराचे हद्दींतील कामांपेक्षा तुमचे कोर्टांत अधिक चागलें काम चालतें " असें बोलत इतकेंच नाहीं, तर, त्याबद्दल कृष्णराव यांस सॉर्टिफिकिटें (आब्रू पत्रें) हीं देऊन जात व सरकारांसही त्याबद्दल तारिफ लिहित; आणि सरकारांकडून त्याबद्दल रघुनाथराव यांस तारिफेचीं पत्रें हीं येत.

याप्रमाणें विंचूरचे दौलतींत सर्व कामें उत्तम प्रकारें चालल्यानें आपले बंधूंचें मन सर्व प्रकारें अनुकूलतेचें आहे असें रघुनाथराव यांचे मनांत ठसून त्यांची सर्व फिकीर दूर झाली.

याच सुमारास रघुनाथराव यांची कनिष्ट पत्नी वयांत येऊन तिचीही प्रपंचास मदत होऊं लागली; आणि त्यांच्या उभय पत्न्या एकविचारें वागत असल्यानें त्यांचें मनास मोठें समाधान वाटूं लागलें. सारांश, ते दिवस त्यांचे मोठे सुखसमाधानाचे होते. तथापि त्यांचे मनास पुनः उद्विग्नता येण्यास लौकरच एक कारण झालें. त्याचा गोष्वारा पुढें लिहितों.

कोर्ट आफ डिरेक्टर्स (कंपनी सरकारचें लंडन शहरांतील मुख्य कोर्ट) यानें सन १८४२ इ० सालीं सरंजाम चालविण्याचे बाबदींत कांहीं नवीन रूल (कानू) करून ते मुंबई सरकाराकडे पाठविले होते. त्या रुलांत अशा बिकट शर्ती घातलेल्या होत्या कीं तेणेंकरून बहुतेक सरंजाम खालसा होणारे होते. त्या रुलांअन्वयें दक्षिणेंतील दरोबस्त सरंजामाच्या चौकशा कर्ण्याविषयीं त्या वेळचे पुणें येथील एजेंट मिस्तर जानवार्डन् यांस मुंबई सरकारचा हुकूम येऊन थडकला. तो पाहून सर्व सरंजामदार आपआपले ठिकाणीं लाचार व दिलगीर होऊन बसले. सरकार

हुकूमाअन्वयें मिस्तर वार्डन यांनीं चौकशा सुरू केल्या. त्या कामांत सरंजामदारांपासून पुरावे मागून घेऊन प्रत्येक सरंजाम कोणत्या शर्तीनें चालवावा याचा विचार होऊं लागला. त्यावेळेस रघुनाथराव यांस एजेंटसाहेबांकडून एक पत्र आलें, त्यांत आपले घराण्याकडे सन १७५१ इ० पूर्वी काय सरंजाम चालत होता त्याबद्दल पुराव्याचे दाखले पाठवावे म्हणून लिहिलें होतें. अशा प्रसंगीं रघुनाथराव यांजपाशीं पुरातन माहितगार असा कोणीही कारभारी अगर कारकून राहिला नव्हता. ते स्वतः झटले तर अल्पवयीं असून प्राचीन गोष्टी त्यांस मुळींच माहित नव्हत्या. तशांत पूर्वी सन १८०२ इ० सालीं यशवंतराव होळकर यांनीं पुण्यावर चढाई केली त्या वेळेस त्यांचा एक सरदार मीरखान यानें विंचूरकर यांचा विंचूर येथील वाडा जाळून टाकिला त्यांत विंचूरकर यांचे बहूत कागदपत्र जळून गेले होते, आणि जे कांहीं इतर ठिकाणीं राहिले होते त्यांची दक्षिणेंत इंग्रजी अमल होण्याचे धालमेलींत अफरातफर झाली होती. त्यामुळें एजेंटसाहेबांनीं मागितलेले दाखले कितीएक दिवस पर्यंत त्यांस हाजिर करितां आले नाहींत; आणि पुढें काय करावें हें त्यांस सुचेनासें होऊन त्यांचे मनास मोठी विवंचना प्राप्त झाली. तथापि, ईश्वर दयेनें ती विवंचना लौकरच दूर झाली, कारण, ते दाखले मिळविण्यास्तव त्यांनीं आपले पदरचे पिढीजादे कामगारांचे घरचीं जुनी दफतरें पाहाण्यास कारकून बसविले. तेव्हां माजी पुरातन कारभारी सालकाढे यांचे घरांत विंचूरकर घराण्याची कांहीं जुनी दफतरें (रुमाल) सांपडलीं. त्यांत सन १७५१ इसवी पूर्वी रघुनाथराव यांचे निपणजे विठ्ठल शिवदेव यांचे हातांत उत्तर हिंदुस्थान प्रांतीं अकरा माहाल असून सन १७४३–४४ इ० सालीं त्या पराक्रमी पुरुषास दक्षिणेंत रासें व मांडकी हे गांव जाहागीर मिळाले असल्याबद्दल बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या अस्सल सनदा व त्यांचे दफ्तरचे दाखले सांपडले. शिवाय वि-

कुल शिवदेव यांस पूर्वी दिलेल्या देहेनग्या एकत्र करून त्याबद्दल सन १७६२ इ० सालीं सालिना रुपये १६,८५,००० चे आकाराचा एकंदर मुलुक पेशवे माधवराव बल्लाळ यांनीं लावून दिल्याचाही दाखला सांपडला.

मग रघुनाथराव यांनीं वर लिहिलेले एकंदर दाखले एजेंटसाहेब यांजकडे पाठवून दिले, आणि मागाहून त्या साहेबांची मुद्दाम भेट घेऊन त्यांस समक्ष कळविलें कीं, "हाल्लीं चालत असलेली जाहागीर वंशपरंपरेचे शर्तीनें चालविण्याबद्दल माझे वडील तात्यासाहेब यांस सर जान मालकम् व आनरेबल मौंटस्टुअर्ट एलफिन्स्टन माजी सोलकमिशनर यांजकडून वचनें मिळाल्याचा मजकूर मीं त्यांचें तोंडानें ऐकिला आहे. या करितां सदर्हू जाहागीर वंशपरंपरेनें मजकडे चालविण्याविषयीं सरकारास सिफारिष कर्ण्याची मेहेरबानगी करावी." त्याजवर मिस्तर वार्डन साहेब ह्मणाले कीं, "आपला सरंजाम वंशपरंपरा चालविण्याचे बाबदींत मालकम्साहेब यांनीं आपले वडिलांस वचन दिलें तें खरें आहे, व त्याच वचनाचें आधारानें तो वंशपरंपरेनें चालवावा ह्मणून मि. एल्फिन्स्टन यांनीं दफतरीं दाखला लिहून ठेविला आहे. सबब मी आपले ह्मणण्याप्रमाणें सरकारास सिफारिष करीन. आपण बिलकूल फिकीर करूं नये."

याच सुमारास एक गोष्ट झाली ती कांहीं महत्वाची वाटल्यामुळें आह्मी ती पुढें लिहितों.

दक्षिणेंत इंग्रजी अंमल होतांच कपतान पार्टिंजर म्हणून जे साहेब अहंमदनगर जिल्ह्याचे कलेक्टर झाले होते, त्यांनीं सरकारची चाकरी नेकीनें केल्यावरून पुढें त्यांस बारोनेटची पदवी मिळून लोक त्यांस "सर हेन्रीपार्टींजर" असें म्हणूं लागले. चीनदेशांत अफूचे व्यापाराचे संबंधानें झालेल्या बखेडयाचा पक्का व निरंतर चालेल असा बंदोबस्त कर्ण्यास्तव इंग्रज सरकारानें त्यांस त्या देशास पाठविलें होतें. आपले सरकारचे खात्रीप्रमाणें

त्या बखेडयाचा निकाल केल्यावर ते इंग्लंडास परत जात असतां मुंबईस उतरून पुण्यास आले. त्या साहेबांबरोबर आपले वडील तात्याहेब यांची निहायत दोस्ती होती असें रघुनाथराव यांस ऐकून माहित होतें. सबब त्यांनीं मिस्तर वार्डन एजेंटें यांचे मार्फत त्यांची भेट घेतली. त्या भेटींत तात्यासाहेब यांजबरोबर आपली मोठी दोस्ती असण्यासंबंधीं त्यांनीं रघुनाथराव यांस कित्येक मागील गोष्टी सांगितल्या. ते साहेब उदार व मोकळ्या मनाचे असून मोठे भारदस्त व प्रतिष्टीत होते. त्यांचा मुक्काम पुण्याचे छावणींत होता. मुंबईचे गव्हरनर साहेब यांनीं त्यांस आपले दापोडी येथील बंगल्यांत बाल (मडमांचा नाच) व जाफत दिली. त्या प्रसंगीं पुण्यांतील दरोबस्त बडेलोकांस पानसुपारीकरितां बोलावणीं झालीं होतीं. रघुनाथराव यांसही बोलावणें झाल्यावरून ते तेथें गेले होते. ते पार्टिजरसाहेब यांस भेटल्यावर ते साहेब शिष्टसांप्रदायाप्रमाणें त्यांशीं बोलूं लागले. त्या बोलण्यांत त्यांनीं रघुनाथराव यांस असें सांगितलें कीं, "आपले वडील तात्यासाहेब हे मोठे इमानदार व थोर मनाचे सरदार होते. त्यांनीं आपलें अत्यंत मोठें नुकसान सोसून आपले मालिक पेशवे यांजबरोबर शेवटपर्यंत नेकीनें वर्तन केलें. असें उदाहरण पेशवाईतील सरदारांचे घराण्यांपैकीं आपलेंच घराण्यांत आढळलें." पुढें अशाच प्रकारें कांहीं वेळपर्यंत परस्परें भाषण झाल्यानंतर साहेब मौसूफ यांनीं रघुनाथराव यांस बिदाकरून दिलें. पुढें लौकरच ते साहेब विलायतेस निघून गेले.

मिस्तर वार्डन् एजेंट यांनीं लौकरच दक्षिणेंतील प्रत्येक सरंजाम पुढें चालविण्याची शर्त ठरवून एक पट तयार केला आणि तो मुंबई सरकाराकडे पाठवून त्यांत लिहिलेल्या बहुतेक जुन्या सरदारांचे सरंजाम वंशपरंपरेचे शर्तीनें चालविण्या विषयीं त्या सरकारास आपले रिपोर्टांत सिफारिष लिहिली. हें जरूरीचें व महत्वाचें काम संपल्यावर ते साहेब रजा घेऊन विलायतेस गेले.

सदर्हू सरंजामपट मुंबई सरकारानें कोर्ट आफ डिरेक्र्सट यांज-कडे विचाराकरितां पाठवून दिला. तत्रापि त्यांत पुष्कळ चुका झाल्या होत्या असें त्या कोर्टास वाटल्यावरून त्यानें तो पट पुनः चौकशी कर्ण्यास्तव मुंबई सरकाराकडे परत पाठविला. त्या सरकारानें तो मिस्तर ब्रौन नांवाचे जे साहेब नुकतेच पुण्यास ए-जेंटीचे कामावर आले होते त्यांजकडे पुनः चौकशी कर्ण्यास्तव पाठवून दिला. याप्रमाणें सदर्हू सरंजामपट आणखीही एक वेळा विलायत सरकारापर्यंत जाऊन चौकशीस्तव परत आला. शेवटीं सन १८४९ इसवी सालीं इनाम कमिटी स्थापन कर्ण्याविषयीं प्रथम उपक्रम निघाला, आणि त्याजवर विलायत सरकारापर्यंत आणखीही पत्रव्यवहार चालून सन १८५१ इसवी सालीं ती क-मिटी पुणें येथें स्थापन झाली. पुढें तिचे कचेरींत दक्षिणेंतील दरोबस्त सरंजामांच्या पुनः चौकशा कर्ण्याचें काम झपाटयानें चालूं लागलें.

सन १८४७ इ० सालीं रघुनाथराव यांची वडील पत्नी प्रसूत होऊन तिला कन्या झाली; परंतु पुढें त्या बाईस सुतिका रोग झाला. तो नाहींसा होण्यास्तव रघुनाथराव यांनीं दाहा महिने पर्यंत बहुत उपचार केले; परंतु कांहींच उपयोग न होतां शेवटीं सन १८४८ इ० सालीं त्या बाईस देवाज्ञा झाली. पुढें दोन म-हिन्यांनीं तिची तान्ही कन्याही वारली. या बाईचे अंगीं पातिव्रत्य धर्म वर्णनीय होता, त्यामुळें तिचे वियोगानें रघुनाथराव यांस अ-त्यंत दुःख झालें. त्या दुःखाचें परिमार्जन होऊन मनाची स्वस्थता व्हावी म्हणून रघुनाथराव यांनीं उत्तर हिंदुस्थानांतील तीर्थयात्रा कर्ण्याचा विचार आपले बंधूंस बोलून दाखविला. तेव्हां त्यांनीं घर सोडून न जाण्याविषयीं रघुनाथराव यांस पुष्कळ प्रकारें आग्रह केला; परंतु यात्रेस जाण्याचा विचार त्यांचे मनांत दृढ झाला अ-सल्यामुळें त्यांनीं बंधूंचे आग्रहास मान न देतां पुण्यास जाऊन एजेंटसाहेब यांचे मार्फत सफरेस जाण्याविषयीं सरकारची पर-वानगी मिळविली, व त्या खेरीज, सफरेंत आपली चांगली

व्यवस्था राहावी म्हणून उत्तर हिंदुस्थानांत ज्या ज्या राजधान्या व शहरें त्यांस पाहावयाचीं होतीं त्या त्या राजधान्यांतील इंग्रज सरकारचे रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजेंट व इतर अधिकारी यांचे नांवांचीं पत्रें त्यांनीं एजेंट साहेब यांजपासून घेतलीं. नंतर ते लाहानशा लवाजम्यानिशीं सुमुहूर्तावर निघून चालते झाले. *

रघुनाथराव हे पाहाडांतील बद्रिकेदार वगैरे ठिकाणच्या यात्रा करित करित प्रयागास येऊन पोहोंचले. त्यासुमारास त्यांची कनिष्ट पत्नी जी अजारीपणामुळें त्यांबरोबर न जातां त्यांचे आज्ञेवरून विंचूर येथेंच राहिली होती तिला देवाज्ञा झाली. हें खेदकारक वर्तमान रघुनाथराव यांस समजतांच, नानाप्रकारच्या तीर्थयात्रा केल्यामुळें व चमत्कारिक ठिकाणें व अपूर्व पदार्थ पाहिल्यानें त्यांचे मनास जी कांहीं स्वस्थता प्राप्त झाली होती ती नाहींशी होऊन पूर्ववत् त्यांचे चित्त पुनः उदास झालें, तत्रापि त्यांनीं यात्रेचा क्रम बंद न करितां पुढें तसाच चालविला.

---

* रघुनाथराव यांनीं सन १८४१ इसवी पासून कित्येक धर्मकृत्यें व तीर्थयात्रा केल्या, व त्याचप्रमाणें कित्येक सत्पुरुषांचीं दर्शनें घेऊन त्यांचे समागम केले वगैरे गोष्टींबद्दल वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री गणेशशास्त्री लेले त्रिंबककर यांनीं "तीर्थयात्रा प्रबंध" या नांवाचें एक पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचें काम चालविलें आहे. त्यांत वर लिहिलेली गोष्ट व इतर यात्रासंबंधीं वगैरे पुष्कळ मनोरंजक गोष्टी आहेत, सबब तें पुस्तक वांचून पाहाण्याविषयीं आम्ही वाचकांस सूचना करितों.

प्रकरण २.

पुढें सन १८५१ इसवी सालीं रघुनाथराव हे विंचुरास परत आल्यावर त्यांनीं आपली कनिष्ट मातूश्री सत्यभामाबाई यांची समजूत केली आणि त्यांस विंचुरास नेऊन आपले वाड्यांत ठेवून घेतलें.

याच सुमारास वडिलार्जित जंगम् मिळकतीची त्रिवर्ग बंधूं मध्यें वांटणी होण्याविषयीं वडील मातूश्री लक्ष्मीबाई यांजकडून उपक्रम निघून ती करण्यांत आली. ती होण्यापूर्वी त्रिवर्ग बंधूंनीं आपसांत असें ठरविलें कीं सदर्हू मिळकतीपैकीं ज्याचे ताब्यांत ज्या वस्तू असतील त्या त्याचे ताब्यांतच राहाव्या, आणि मातूश्री जी वस्तू ज्यास देतील ती त्यानें स्विकारून संतुष्ट राहावें. तो ठराव मातूश्री यांत ही मान्य झाल्यावरून त्यांनीं शिल्लक असलेल्या जडजवाहिराची वांटणी करून दिली. तींत, रघुनाथराव हे वडील असल्यामुळें वडिलार्जित देव व त्यांचे अलंकार, पोथ्या, सनदापत्रें वगैरे उपयोगाचे दरोबस्त कागदपत्र त्यांस मिळून नरसिंहपूर येथील श्रीनृसिंह देवाचे संस्थानची वहिवाटही त्यांजकडेसच गेली.

सन १८५२ इ० चे मार्च महिन्यांत रघुनाथराव यांनीं सातारा येथील गोविंद नाईक पालकर यांचे वडील कन्ये बरोबर आपला विवाह केला.

सनमजकूरचे मे महिन्यांत, सरकारानें, रघुनाथराव यांचे कनिष्ट बंधू कृष्णराव यांची व्यवहारांतील हुशारी, कायद्यांची माहितगारी, प्रामाणिकपणा, प्रतिष्टितपणाचें वर्तन, आणि त्यांचे खान्दानीचा मोठेपणा, या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरवून, त्यांची पुणें येथील सदर अमिनीचे हुद्यावर एकदम नेमणूक केली. पुढें थोडकेच दिवसांनीं कृष्णराव हे आपले कामाचा चार्ज्य घेण्यास्तव पुण्यास गेले.

ह्या उभयतांचे कनिष्ट बंधू माधवराव यांस त्याकाळीं व्यवहा-

राची चांगली माहिती नसल्याकारणानें ते घरीं रिकामे बसून काळ घालवीत होते. त्यांनीं हुशार होऊन नांवलौकिक मिळवावा असें रघुनाथराव यांस वाटल्यावरून त्यांनीं त्यांस कायद्यांचा अभ्यास करण्यास लाविलें. त्या प्रमाणें माधवराव यांनीं चांगले परिश्रम केल्यामुळें त्यांस कायद्यांचें चांगलें परिज्ञान झालें. सबब रघुनाथराव यांनीं संन १८५२ इ० सालीं पुणें जिल्ह्याचे त्या वेळचे ज्यडज्य मिस्तर राबर्ट कीज यांस त्यांची परिक्षा घेण्याविषयीं विनंती केली. माधवराव यांची ही परिक्षा उतरल्यावर, त्यांस ज्यडज्य साहेब यांजकडुन सर्टिफिकेट मिळालें. त्यांत ते दिवाणी व फौजदारी कामांत हुशार आहेत असें लिहिलेलें होतें.

रघुनाथराव यांनीं माधवराव यांची व्यवहारांतील हुशारी पाहून, पुढें सन १८५४ इ० सालीं, त्यांजकडे आपले दौलतीचा सर्व कारभार सांगितला आणि आपले संस्थानांतील दिवाणी व फौजदारी अधिकार त्यांस देण्याविषयीं, एजेंटसाहेब यांचे मार्फत, सरकारास विनंती केल्यावरून सरकारानें ते त्यांस देण्याविषयीं आपले जुडिशिअल खात्यांत ठराव केला. त्यावरून माधवराव हे दौलतीचीं दरोबस्त कामें पाहूं लागले. त्यांची बुद्धी दिवसांदिवस अधिक प्रकाशीत होत चालल्यामुळें थोडकेच दिवसांत ते सर्व कामकाजांत निष्णात झाले आणि त्यांचे वडिल बंधू कृष्णराव यांनीं दिवाणीं, फौजदारी, मुलकी, वगैरे कामांचे वहिवाटींत लौकीक संपादिला होता त्यापेक्षां यांनीं अधिक संपादिला. अणखी तर काय ? पण सरकारी कामगारांनीं सुद्धां त्यांची तारीफ केली. जिल्ह्यांचे ज्यडज्य व माजिस्त्रेट आणि सदर अदालतीचे सर्कीट ज्यडज्य यांनीं विंचुरचे कोर्टांत इनसाफाचें काम चांगले रीतीनें चालत असल्याबद्दल माधवराव यांस सर्टिफिकिटे (आब्रूपत्रें) दिलीं. त्या शिवाय माधवराव यांनीं विंचूर संस्थानचे फ़ायद्याचीं कित्येक कामें मोठ्या शाहाणपणानें केलीं. तीं अशीं कीं जाहागीर गांवांपैकीं अहमदनगर जिल्ह्यांतील वळदगांव व धामोरी व

पुणें जिल्ह्यांतील मांडकी या गांवांचे शींवसंबंधानें शेजारचे खालसा गांवांबरोबर बहुत वर्षेपर्यंत तंटे चालले होते, त्यामुळें त्या तिन्हीं गांवांतील पुष्कळ जमिनी पडित पडल्या होत्या; परंतु त्यांनीं त्याबद्दल सरकारांत उद्योग चालवून त्या तंट्याचे निकाल करून घेतले; तेणेंकरून त्या जमिनींची लागवड होऊन, संस्थानचें उत्पन्न दरसाल सरासरी एक हजार रुपये वाढलें. शिवाय, सरकारचे एका आक्टा अन्वयें सायर वगैरे बाबी माफ झाल्या-होत्या, त्याबद्दलही त्यांनीं सरकारांत काम चालवून संस्थानचें नुकसान न होईल असे ठराव करून घेतले.

सन १८५१ इसवी सालीं पुणें येथें इनाम कमिटी स्थापन झाली असें वर लिहिलेंच आहे. त्या कमिटीचे अधिकार पुढें अधिकाधिक वाढून सन १८५५ इ० सालीं तिची मोठी बडेजाव झाली, आणि इनाम कमिशनर कपतान कौपर यांची सर्वत्र ख्याती होऊन त्यांचे हुशारीवर मुंबई सरकारचा मोठा भरंवसा बसला. तेव्हां राजकीय संबंधाचे कित्येक कामांत तें सरकार त्यांची सल्ला घेऊं लागलें. कौपर साहेब यांस इनाम, सरंजाम, वगैरे देहेनग्यांचे बाबतींत चौकशा कर्ण्याचे कामीं पेशवे सरकारचे अमलांतील गांवगंनाच्या जुन्या कागदपत्रांची गरज लागली; परंतु ते कागदपत्र देशमूख, देशपांडे, व इतर हक्कदार यांचे ताब्यांत असल्यामुळें ते हातीं येणें मोठें दुरापस्त होतें. त्यांचा शोध लावून ते मिळविण्याचे कामीं माधवराव यांनीं रघुनाथराव यांचे हुकुमावरून इनाम कमिटीचे खात्यास कार्य सिद्धी होण्या जोगी मदत केली. त्यामुळें पुष्कळ कागदपत्रांचा शोध लागून ते साहेबमौसूफ यांचे हातीं आले. त्यांखेरीज त्यांचे विंचूर येथील वाड्यांत जे जुने कागदपत्र होते व जे त्यांचे पदरचे पिढिजादे कामगारांचे घरीं सांपडले ते सर्व त्यांनीं जमा करून आपले पत्रासोबत कौपर साहेब यांजकडे पाठवून दिले. तेणेंकरून त्या साहेबांस मोठी खुषी होऊन त्यांनीं त्याबद्दल मुंबई सरकारास वि-

चूरकर घराण्याची तारीफ लिहिली आणि सरकारांनेंही त्याबद्दल आपली खुष मर्जी दर्शित केली. *

अहमदनगर जिल्ह्यापैकीं कोपरगांव तालुक्कांत बेटकोपरगांव येथील शुक्रेश्वर, कचेश्वर आणि श्रीवासुदेव व कोपरगांव येथील गोवर्धनधारी या देवांचे संस्थानांस माजी अमलापासून सालीना रुपये ६०८० साहा हजारांची एकंदर नेमणूक मिळत आहे. या नेमणूकेचा खर्च त्या संस्थानचे पंचांचे मार्फत होत असे; परंतु पंच लोकांमध्यें तक्रारी उत्पन्न होऊन सदर्हू खर्चाचे बाबदींत अत्यंत अव्यवस्था झाली; सबब सरकारानें अहमदनगर जिल्ह्याचे कलेक्टर यांस वर लिहिलेल्या संस्थानची वहिवाट विंचूरकर यांचे हातीं देण्याची मंजुरी दिल्यावरून त्यानीं रघुनाथराव यांस सरपंच नेमिलें आणि त्यांचे पदरचे लोकांस पंच नेमून त्यांचे मार्फत सर्व व्यवस्था चालविली. तेणेंकरून संस्थानचा बंदोबस्त उत्तम प्रकारें होऊन सर्व तक्रारी मिटल्या. त्या वेळेपासून आजपर्यंत सदर्हू संस्थानची वहिवाट सुरळीत चालत आहे.

याचप्रमाणें अहमदनगर जिल्ह्यांतील मौजे नानज हा गांव आळंदी येथील ज्ञानेश्वराचे चौघडयाचे खर्चाकडे चालत आहे. त्या गांवाची वहिवाट ज्या मनुष्याकडे होती त्याजकडून वसुलाचे कामांत अव्यवस्था होऊं लागली, सबब अहमदनगरचे कलेक्टर यांनीं सदर्हू गांवची वहिवाट रघुनाथराव यांचे हवालीं केली. त्या वेळेपासून सदर्हू गांवचे वसुलाची व्यवस्था उत्तम प्रकारें चालत असून एकंदर उत्पन्न ज्ञानेश्वराचे चौघडयाचे खर्चाकरितां नियमित वेळेस पोंहोंचत आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे जज्य मि० जे० डब्ल्यु वुडकॉक हे त्या जिल्ह्यांत आपले ताब्यांतील दिवाणी कोर्टें पाहण्यास्तव फिरत असतां, ते विंचुरा नजीक आल्याचें वर्तमान रघुनाथराव यांस समजल्यावरून त्यांनीं त्या साहेबांस विंचुरास येण्याविषयीं आपली

* सरकारचा राजकीय खात्यांतील तारीख २२ माहे मार्च्य सन १८५६ इसवींचा ठराव.

इच्छा दर्शित केली. त्यावरून ते विंचुरास आले. तेथें रघुनाराव यांनीं त्यांचा उत्तम प्रकारें सत्कार केल्यावर त्यांस आपले कोर्टाची दिवाणी व फौजदारी दफ्तरें दाखविलीं. साहेब मौसूफ यांनीं तीं तपासून पाहिल्यावर त्यांस खुषी झाली. मग त्यांनीं माजी सदर दिवाणी अदालतीस त्या बाबद रिपोर्ट केला. सदर अदालतीनें त्या प्रकर्णीं सरकारास पत्र लिहिल्यावरून सरकारानें आपले इनसाफ खात्यांत त्याविषयीं ठराव करून तो सदर अदालतीस कळविला. सदर्हू ठरावांत विंचूर येथील दिवाणी कोर्टाचें काम चालण्याचे बाबदींत आपल्यास बहुत खुषी झाल्याचा मजकूर सरकारानें लिहिला होता. *

याच सुमारास मुंबई इलाक्यांत विद्या वृद्धीस विशेष उत्तेजन देण्याचे इरादानें मुंबई सरकारानें गांवोगांव तजविजा सुरू केल्या. त्या कामीं रघुनाथराव यांनीं विद्याखात्याकडील कामगार यांची यथाशक्ति सरबराही केल्यामुळें किती एक सरकार खालसा गांवीं नवीन शाळा स्थापन झाल्या. त्याचप्रमाणें त्यांनीं स्वतःचे जाहागीर गांवांपैकीं बहुतेक मोठया गांवीं शाळा स्थापन करून विद्या शिकण्यास्तव त्या गांवचे लोकांस उत्तेजन दिलें. ही गोष्ट सरकारचे विद्या खात्याकडील अधिकारी यांस समजल्यावर त्यांनीं त्या बाबदींत मुंबई सरकारास रिपोर्ट करून त्यांत रघुनाथराव यांची तारीफ लिहिली. सरकारानें त्या रिपोर्टाचे जबाबांत रघुनाथराव यांचे वर्तनानें आपल्यास खुषीझाली असें कळविलें. †

---

* अहंमदनगरचे जज्य मिस्तर जे डब्ल्यु वुडकॉक यांजकडून सदर दिवाणी अदालतीस नं. ३६४ ता. १६ मे स. १८५४ चें पत्र गेलें तें.

सरकाराकडून सदर दिवाणी अदालतीचे रजिस्ट्रार यांस नं. ५४२० ता० १६ डिसेंबर स. १८५४ इ. चें पत्र गेलें तें.

† १ राबर्ट कीज एस्कायर दाक्षिणेंतील सरदार लोकांबद्दलेच एजेंट यांजकडून माधवरावदादासाहेब विंचूरकर यांस नं. ३५१ ता० २ एप्रील सन १८५६ चें मराठी पत्र आलें तें.

२ मुंबई सरकाराकडून विद्या खात्यावरील मुख्य अधिकारी [डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन] यांस जनरल खात्यांतून नं. १४०५ तारीख १४ जून सन १८५८ चें पत्र गेलें तें.

विंचूर संस्थानांत पुष्कळ गांवीं चावडया व मारुतीचीं देवालयें मोडकळीस आलीं होतीं. ही स्थिती रघुनाथरावयांस त्यांचे शेकदार यानीं कळविल्यावरून त्यानीं त्या सर्वांच्या मरामती करविल्या. शिवाय ज्या गांवांत अजी चावडी अगर देवालय नव्हतें तेथें स्वतःचे खर्चानें नवीन चावडी बांधविली, व त्याच प्रमाणें कित्येक गांवांस नवीन गांवकुसें करविलीं. तसेंच गांवोगांव जुने पाटबांधारे बेमरामत झाल्यामुळें त्यांचें पाणी फुटून बाहेर वाहून जात होतें असें त्यांस कळल्यावरून त्यानीं त्यांची डागडुजी करविली आणि जेथें नवीन बांधारे होण्यासारखीं स्थलें होतीं तेथें ते बांधवून पाण्याचे पुरवठयाकरतां शिवारांतून पाट सुरू केले.

पूर्वीं दक्षिणेंतील सरदार लोकांबद्दलचे एजंट हे पुणें येथें दसऱ्याचे सणाबद्दल दरबार करून त्या प्रसंगीं जे सरदार हाजिर असतील त्यांस पोषाग देत असत; परंतु सन १८५७ इ० सालीं त्यांनीं सरकार हुकमावरून ती वहिवाट बंद केली; आणि माहाराणी क्वीन विक्टोरिया [सांप्रत केसरेहिंद] यांचे जन्मदिवशीं ह्मणजे ता० २४ मे रोजीं दरबार करून त्यास जे सरदार येतील त्यांस पोषाग द्यावे असा ठराव केला. तथापि विंचूरचे चीफ रघुनाथराव अंणासाहेब यांचे विनंतीवरून सरकारानें सदहू दरबारांत त्यांस स्वतः हाजिर होण्याची शर्त रद्द करून त्यांस पोषाग द्यावयाचा तो त्यांचे वकिलाचे हवालीं करीत जावा म्हणून एजंट साहेब यांस सन १८५७ इ० सालीं हुकूम पाठविला. त्याप्रमाणें हाल्लीं रघुनाथराव यांस त्या वार्षिक दरबारांत वकील मार्फत पोषाग मिळत आहे.

सन १८५७ इ. चे एप्रील महिन्यांत उत्तर हिंदुस्थान प्रांतीं बंगालखात्यांत एक भयंकर लष्करी दंगा उपस्थित झाला, आणि पुढील (मे) महिन्यांत काळे पलटणींतील शिपाई लोकांनीं मीरत येथील छावणींत एकाएकीं गोरे लोकांवर उठून पुष्कळ साहेब लोकांस ठार मारिलें; आणि सरकारी तोफखाना व खजीना ताब्यांत

घेऊन तुरुंगांतील कैदी लोक सोडून दिले; आणि गोरे लोकांचे बंगल्यांस आगी लावून त्यांस मुलांबाळांखुद्धां प्राणरक्षणार्थ पळून जाणें भाग पाडिलें. नंतर कांहीं तोफा व दारू गोळा वगैरे बरेंच जंगी सामान बरोबर घेऊन ते लोक दिल्लीकडे कूच करून गेले. दिल्लीचे छावणींतील काळे पलटणींचे शिपाई व स्वार त्या दंगेखोरांस सामील झाल्यामुळें त्यांनीं तेथेंही गोरे लोक मारून त्या कोटबंदी शहरांत अमल केला, आणि मोघल बादशाहास तख्तावर बसवून त्याचे नावानें द्वाही फिरविली. पुढें आग्रा, कोईल, नसिराबाद, महू, कानपूर, झाशी, बांदा वगैरे कित्येक ठिकाणचे छावण्यांतही वर लिहिल्याप्रमाणेंच दंगे माजले. त्यांपैकीं कित्येक छावण्यांतील शिपाई लोक दिल्लीस जाऊन तेथील दंगेखोर लोकांत मिळाले. शेवटीं दिल्ली, कानपूर व झाशी हीं दंग्याची मुख्य ठिकाणें झालीं. मग इंग्रज सरकारानें पंजाब वगैरे प्रांतांत नवीन शिपाई लोक भरती केले, आणि इंग्लंडाहून मदत बोलावून प्रथम दिल्ली शहरावर हल्ला केला आणि तेथील दंगा अगदीं मोडून टाकून तें शहर ताब्यांत घेतलें. दंगेवाले तेथून निघून लखनौ शहरास गेले. तेव्हां तेथें मोठी जमात होऊन तें शहर दिल्लीप्रमाणेंच दंग्याचें मुख्य ठिकाण झालें; परंतु आमच्या जवांमर्द सरकारानें मोठ्या जुरतीनें तेथीलही दंगा मोडून तें शहर आपले ताब्यांत घेतलें, आणि दंगेखोरांचा पाठलाग करून त्यांस नेपाळवाल्याचे हद्दींत हांकून लाविलें. त्याचप्रमाणें सरकारानें इतर ठिकाणच्या दंगेखोरांवर हल्ले करून त्यांचेही दंगे क्रमाक्रमानें मोडून टाकिले.

हे सर्व दंगे मोडण्यास्तव सरकारचे सर्व खात्यांत तयारी चालू असतां, " सरकार जी नौकरी फरमावितील ती बजावण्यास मी सिद्ध आहे. " असें रघुनाथराव यानीं पुण्याचे एजेंट यांचे मार्फत मुंबई सरकारास कळविलें. त्यांचे जवाबांत सरकारानें एजेंट साहेब यांस ता० २७ सेप्टेंबर सन १८५७इ०चे पत्रानें असें कळविलें कीं ' " विंचूरकर यांचे राज्यनिष्ठेबद्दल सरकार बहुत

खुष झाले असून ते त्याबद्दल विलायत सरकारास लिहून पाठवि-तील.”

वर लिहिलेला लष्करी दंगा वाढतां वाढतां त्याचे तुषार मुंबई इलाख्यापर्यंत येऊन पोहोंचले; आणि खानदेश व नगर जिल्ह्यांत भिल्ल लोकांनीं उठून जागोजाग बंडें केलीं. शिवाय कित्येक ठिकाणीं भुरटेचोर उठून त्यांनीं मुलुकांत रस्तेलूट व दरोडे घालण्याचा क्रम सुरू केला.

त्याच वेळेस विंचूर येथील कित्येक गैरचालीचे लोकांनीं पैसा जमविण्याचे इराद्यानें असमंतांतील गांवांत दरवडे घालणें सुरू केलें. ही खबर रघुनाथराव यांस कळतांच त्यांनीं ती नाशीक सबतुकडीचे त्या वेळचे माजिस्त्रेट चापम्यान साहेब व पोलीस सुपरिंटेंडेंट यांस जाहिर करून विंचूरचे बंदोबस्ताकरितां कांहीं पोलीसचे लोक पाठविण्याविषयीं विनंती केली. तेव्हां पोलीस सुपरिंटेंडेंट हे पोलिसाचे कांहीं शिपाई व स्वार बरोबर घेऊन विंचुरास आले; आणि त्यांनीं रघुनाथराव यांची भेट घेऊन ती दरोबस्त फौज विंचूर व त्याचे आसपासचा प्रदेश यांचे बंदोबस्ताकरितां त्यांचे हवालीं केली. सुपरिंटेंडेंट साहेब परत गेल्यावर चापम्यान साहेब माजिस्त्रेट यांनीं विंचुरास येऊन पडलेल्या दरवडयाबद्दल तपास सुरू केला; आणि लष्करी कायद्या अन्वयें तेथील कित्येक वहिमी लोकांस पकडण्याचा इरादा दर्शित केल्यावरून रघुनाथराव यांनीं त्यांस त्या कामीं पुष्कळ मदत दिली. त्यामुळें साहेब मौसूफ यानीं कित्येक वहिमीं लोकांस पकडून फांशीं दिलें आणि विंचूरकर यांचे इमानदारीविषयीं मुंबई सरकारास रिपोर्ट केला.

हें भिल्ल लोकांचें बंड मोडण्यास इंग्रजसरकारचे पोलिस कामगार झटत असतां, विंचूर संस्थानांतील पोलिसचे शिपाई व स्वार यानीं त्या कामीं त्या कामगारांस बरीच मदत दिली होती. त्या विषयीं पुढें सन १८५८इ० सालीं रघुनाथराव व माधवराव यानीं अहंमदनगरचे पोलिस सुपरइन्टेंडेंट यांस रिपोर्ट

केल्यावरून सुपरिंटेंडेंटमौसूफ यांस खुषी झाली, आणि त्यांनीं विंचूरचे पोलिसापैकीं कित्येक लोकांस नक्त पैसा व कित्येकांस पागोटीं अशीं बक्षिसें वांटिलीं.

याच सालीं विंचूर संस्थानचे खानदेशाचे हद्दीवरील दहिवड नांवाचे गांवावर भिल्ल लोकांचा पुढारी भागोजी नाईक यानें भर-दिवसास हल्ला केला. त्या वेळेस विंचूरचे पोलिसपैकीं कांहीं शि-पाई व स्वांर तेथें असून त्या लोकांनीं बहुत परिश्रम केल्यामुळें फक्त लाडशिका नांवाचे वाण्याचे घरा खेरीज बाकी दरोबस्त गांवाचा बचाव झाला.

या शिवाय, भिल्ल लोकांच्या एका टोळीनें शिरूर तालुक्यांत सारोळें येथें दरवडा घातला. त्या दरवडेखोरांपैकीं कांहीं लोकांचा पाठ-लाग सरकारचें पोलीस करीत असतां, त्या भिल्ल लोकांनीं विंचूर संस्थानचे हद्दींत पळ काढिला. त्या वेळेस विंचूरकर यानीं सर-कारचे पोलिसास चांगली मदत केल्यामुळें भिल्लांचे टोळीपैकीं कि-त्येक दरवडेखोर लुटीचे मालानिशीं विंचुरानजीक पकडले गेले; आणि लुटीपैकीं कांहीं मालाचा माग खुद्द विंचूरगांवांतच गेला अ-सतां, त्याचा पुरा पत्ता लावण्यास विंचूरचे चीफ् यानीं जातीनें झ-टून चांगली मदत केली. *

विंचूर संस्थानचे कारभारी माधवराव दादासाहेब विंचूरकर यांनीं सरकारचे पोलीस खात्याचे कामगारांस बंड मोडण्याचे का-मीं चांगली मदत केली ही गोष्ट त्या कामगारांनीं सरकारास कळविल्यावर त्यांस मोठी खुषी होऊन त्यानीं दादासाहेब यांस डेप्युटी माजिस्ट्रेटचा अधिकार दिला † आणि त्यांचे हाताखालीं

* अहंमदनगर डिस्ट्रिक्टचे पोलीस सुपरइनटेंडेंट यांजकडून त्या डिस्ट्रिक्टचे माजिस्ट्रेट यांस ता. ९ नोव्हेंबर सन १८६० चें पत्र गेलें तें.

अहंमदनगरचे डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट यांनीं माधवरावदादासाहेब विंचुरकर यांस नं. ३ ता. ८ जानेवारी सन १८६१ चें मराठी पत्र पाठविलें तें.

† अहंमदनगरचे डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट यांस सरकारचे ज्युडिशिअल खात्यां-तून नं. ३७७६ ता. २३ नोव्हेंबर सन १८५९ चें पत्र गेलें तें.

माजिस्ट्रेटचें काम करण्यास त्या संस्थानचे पिढीजादे फडनवीस वामनराव नारायण सालकाडे यांस थर्ड क्लास माजिस्ट्रेटचा अधिकार दिला.

या संधीस ह्मणजे सन १८५९ चे आक्टोबर महिन्यांत उत्तर हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं शिपाई लोकांचा दंगा मोडला जाऊन स्वस्थता झाल्यावर माहाराणी क्वीन विक्टोरिआ (सांप्रतची केसरे हिंद) यानीं कंपनी सरकारचे हातांतून हिंदुस्थानचे राज्याचा कबजा घेतला; आणि शेष राहिलेला दंगा मोडण्यास्तव जे बंडवाले केवळ दुष्ट व आपमतलबी लोकांचे संगतीनें त्या दंग्यांत सामील झाले होते त्या लोकांस त्यानीं माफी देण्याचा ठराव करून आपले हिंदुस्थानांतील वाइसरॉय (प्रतिनिधि) व गवरनर जनरल लॉर्ड क्यॉनिंग् यांचे मार्फत संपूर्ण हिंदुस्थानांत ता० १ ली नोव्हेंबर सन १८५९ इ० रोजीं जाहीरनामा लाविला. त्यांत वर लिहिलेले प्रकारचे दंगेखोर आपआपले घरीं गेले असतां झालेले गुन्हे त्यांस माफकरण्यांत येतील म्हणून वगैरे मजकूर लिहिलेला होता.

या जाहीरनाम्यांतील मजकूर विंचूर संस्थानचे चीफ् व त्या संस्थानांतील सर्व लोक यांस जाहिर करण्याकरितां नाशिक तुकडीचे माजिस्ट्रेट चाप्म्यान साहेब दुसरे कांहीं साहेबलोकांनिशीं वर लिहिलेले तारिखेस विंचुरास आले आणि त्यांनीं विंचूरचे चीफ रघुनाथराव अंणासाहेब यांजकडून दरबार करवून त्यांत सदहू जाहीरनामा वाचून दाखविला.

सन १८५९ इ० सालीं हिंदुस्थानांत मलिका मुआझमा यांचें राज्य स्थापन झाल्यावर पुढें सन १८६२ इ० सालीं मुंबई येथें नवीन कायदे कौन्सिल् स्थापण्यांत आलें. त्यांतील मेम्बर साहेब लोक असून शिवाय आडिशनल मेम्बर ह्मणून हिंदुस्थानांतील प्रतिष्टित गृहस्थांचीही योजना करण्याविषयीं सरकारचा ठराव झाला. त्यावरून त्या कौन्सिलांत सावनूरचे नबाब, ना-

नाशंकरशेट, अहमदाबादचे सावकार हेमाभाई प्रेमाभाई व रघुनाथराव यांचे कनिष्ट बंधू माधवरावदादासाहेब यांच्या नेमणुका झाल्या.

याचवर्षी आक्टोबर महिन्यांत माधवरावदादासाहेब यांस अहंमदनगर व खानदेश या जिल्ह्यांत चालविण्यास्तव फुलपावर माजिस्ट्रेटचे * अधिकार मिळाले.

सन १८६३ इ० सालीं दादासाहेब विंचूरकर यांची कन्या विवाहास योग्य झाली होती, सबब त्यांचे वडील बंधू व विंचूर संस्थानचे मुख्य रघुनाथरावअण्णासाहेब यांनीं भोर येथील संस्थानिक कैलासवासी नानासाहेब सचीव यांचे पुत्र (भोर येथील सांप्रतचे संस्थानिक)यांस देण्याचें ठरवून लग्नाचा निश्चय केला. हा लग्नसमारंभ त्याच वर्षाचे माघ महिन्यांत भोर येथें झाला. त्या प्रसंगीं औंद येथील प्रतिनिधि, फलटणचे निंबाळकर, साता-रचे माजी राजाचे ताब्यांतील कित्येक सरदार व पुण्यांतील बरेच सभ्य गृहस्थ असे गेले होते. हा समारंभ बहुत दिवसपर्यंत चा-लला असून त्यांत रघुनाथराव यानीं बहुत पैसा खर्च केला; परंतु दुर्दैवेंकरून लग्न झाल्या नंतर सुमारें एक महिन्यानें नवरी मुलगी विंचुरास परत जात असतां मार्गांत महामारीचे उपद्रवानें तिला देवाज्ञा झाली. त्या कारणानें विंचूरकर व सचीव यांचीं मनें किती उदास झालीं असतील हें लिहिणें नकोच; वाचकांचे सहज लक्षांत येईल.पुढें सुमारें तीन वर्षांनीं विंचुरकरांबरोबर झालेला शरीरसंबंध पुनः नूतन व्हावा या हेतूनें नानासाहेब सचीव यांनीं कृष्णराव बापूसाहेब विंचूरकर यांचे कन्येबरोबर आपले पुत्राचा द्वितिय विवाह केला.

याच सालीं मुंबई येथील गव्हरनरचे हुद्यावर सर बार्टल् फ्रीयर या नांवाचे साहेब आले. त्यांनीं दरबार करण्याची

---

* आलीकडे फौजदारी कांमचालविण्याचे बाबदींत नवीन कायदा झाला त्यास साधारणतः क्रिमिनल प्रोसिजर कोड असें म्हणतात. त्यांत फुलपावर माजि-स्ट्रेटचे ऐवजीं फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट अशी संज्ञा लिहिली आहे, व तीच संज्ञा हल्लीं चालू आहे.

जुनी वहिवाट मोडून मोघल बादशाहाचे रीतीप्रमाणें दरबार करण्याचा क्रम सुरू केला.

रघुनाथराव यानीं यावर्षीं कर्नाटक प्रांतांतील तीर्थयात्रेस जाण्याची तयारी केली; परंतु त्यांचे जाण्यास अकल्पित हरकत आली. ती अशी कीं, मुंबई सरकारानें स० १८६३ इ० सालीं देशमुख, देशपांडे वगैरे वतनदार लोकांचे हक्क कायम ठरविण्याकरितां एक कमिशन स्थापून त्यांत माधवरावदादासाहेब विंचूरकर यांस एक मेम्बर नेमिलें; तेव्हां तो नवीन हुद्दा चालविण्यास्तव माधवराव यांस प्रवासास जाणें प्राप्त झालें.त्यामुळें रघुनाथराव यांस आपले संस्थानचा कारभार स्वतः पाहाणें अर्थातच भाग पडलें. मग त्यांनीं आपले बंधू कृष्णरावबापूसाहेब हे ठाणें येथें सदरआमिनीचे हुद्यावर असतां त्यांस कांहीं महिन्यांची रजा घेऊन विंचुरास येण्याविषयीं पत्र लिहिलें. त्याप्रमाणें बापूसाहेब हे एक वर्षाची रजा घेऊन विंचुरास आले. मग रघुनाथराव यानीं आपले संस्थानचा कारभार त्यांचे हवालीं करून आपण स० १८६४ इ० सालीं माहाराष्ट्र देश व कर्नाटक यांतील तीर्थयात्रा करण्यास निघून गेले. सदरहू यात्रा करून विंचुरास परत येण्यास त्यांस तेरा चौदा महिने लागले. *

माधवराव दादा साहेब यांचे कायदे कौन्सिलांतील नेमणुकेची दोन वर्षांची मुद्दत भरल्यावर सन १८६४ इ०चे अव्वलीस सरकारानें त्याच हुद्यावर त्यांची पुनः दोन वर्षें पर्यंत नेमणूक केली.

विंचूर संस्थानांत एकंदर ५० गांव असून त्यांपैकीं बहुतेक नाशिक जिल्ह्यांत, कांहीं अहमदनगर जिल्ह्यांत व दोन पुणें जिल्ह्यांत असे आहेत. नाशिक जिल्ह्यापैकीं येवलें हा गांव जरी त्या संस्थानांत सामिल आहे तरी तेथील दिवाणी व फौजदारी अधिकार रघुनाथराव यांजकडे नसून ते सरकार तर्फेचे अमलदार चालवीत होते. ज्याप्रमाणें हे दोन्ही अधिकार त्यांस इतर जा-

---

* या यात्रेचा वृत्तांत नाशिक येथें वेदशास्त्रसंपन्न रा. रा. गणेशशास्त्री लेले त्रिंबककर यांनीं "यात्राप्रबंध" या नांवानें जो ग्रंथ तयार करून छापिला आहे त्यांत तपसिलवार आढळून येईल,